सोमवार, ०२ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१३५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●MONDAY 02 JANUARY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-135 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5



## वसंत मुंडे यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त विचारांचे अभिसरण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा वाढदिवस म्हणजे केवळ अभीष्टचिंतन आणि शुभेच्छांचा वर्षाव नाही तर विचारांचे अभिसरण करणारा सोहळा ठरला. रविवारी औरंगाबाद येथील पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात विविध दैनिकांचे संपादक, लोकप्रतिनिधी, पत्रकार तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत वसंत मुंडे यांचा वाढदिवस प्रचंड उत्साहात संपन्न झाला. या वेळी वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप, सोशल मीडियाचा वृत्तपत्रांवर झालेला परिणाम, कोरोनानंतर डबघाईला आलेली मराठी वृत्तपत्रसृष्टी व यातून बाहेर पडण्याच्या मार्गावर या वेळी विविधांगी चर्चा झाली. त्यामुळे वसंत मुंडे यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्याला जणू माध्यमांच्या वाटचालीवर प्रकाश टाकणाऱ्या विचारपीठाचे स्वरूप आले होते.**

या सोहळ्याला माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंडे, प्रा.सुरेश पुरी, प्रा.डॉ. दिनकर माने, भाजपचे प्रवीण घुगे, प्राचार्य डॉ. नामदेव सानप, मनोज भारस्कर, राम बुधवंत, एमआयएमचे शहराध्यक्ष शारेक नक्षबंदी, हिमेश उस्मानी, देवगिरी वृत्तचे संपादक अनिल सावंत, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश भगनुरे, राजु वाघमारे, प्रा. डॉ. संजीवकुमार सावळे, सुधीर जगदाळे, विलास इंगळे, रवी गाडेकर, अमोल उबरहंडे, अरुण कानडे, दीपक पाटील, इंद्रजीत खरात, दत्ता मोगरे, ॲड. किशोर जाधव, संतोष सूर्यवंशी, सुरेश कुंन्द्रे, अर्जुन जाधव, शिवनाथ हजारे, अनिस कुरेशी, आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, साहित्यिक बाळासाहेब जोगदंड, पत्रकार आरेफ देशमुख, जगदिश कस्तुरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, जिल्हा संघटक विलास शिंगी, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, अतुल खंडगावकर, नागेंद्र वाघमारे, शिवाजी धात्रक, पत्रकार संदिप घंटे, सचिन उबाळे, आदित्य बरांडे आदिंसह विवध दैनिक, वृत्तवाहिन्या, न्यूज पोर्टलच्या संपादक, पत्रकार, छायाचित्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






## महानेत्रदान नोंदणी शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात महानेत्रदान नोंदणी शिबीर राबविण्यात आले.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा 1 जानेवारी 2023 रोजी वाढदिवस प्रचंड उत्साहात साजरा करण्यात आला. मागील अनेक वर्षांपासून राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमात रक्तदान, देहदान, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान असे अनेक कार्यक्रम आतापर्यंत घेण्यात आले आहेत. या उपक्रमाची राज्यभरात नोंदही घेण्यात आली आहे. यावर्षी राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभरात नेत्रदान नोंदणी शिबीर राबविण्याचा संकल्प केला होता. या शिबिराला महाराष्ट्र राज्यातील पत्रकार तसेच नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## तर शिंदे-फडणवीस सरकार कोसळू शकते; खडसे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर पुन्हा एकदा निशाणा सधला आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या आमदारांमध्ये मोठी अस्वस्थता आहे. एकमेकांची उणीदुणी ते काढत आहेत. अशाच प्रकारे या सरकारमधील अस्वस्थता वाढली तर हे सरकार कोसळू शकते, अशा प्रकारची टीका एकनाथ खडसे यांनी भाजपा आणि शिंदे सरकार वर केली आहे. शिंदे-फडणवीस सरकारमधील आमदारांमध्ये एकीकडे अस्वस्थता तर दुसरीकडे पुन्हा न्यायालयाच्या निर्णयाची टांगती तलवार देखील आहे. त्यामुळे न्यायालयाचा काय निर्णय येतो यावर देखील सरकारचे भवितव्य अवलंबून आहे आणि अशाच प्रकारे या सरकारमधील अस्वस्थता वाढली तर हे सरकार कोसळू शकते, अशा शब्दात एकनाथ खडसे यांनी आपले मत व्यक्त केल आहे. शिंदे-फडणवीस सरकारमधील प्रत्येक आमदाराला मंत्री व्हायचं आहे. त्यामुळे ते गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत. अशा परिस्थितीत ते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. शिंदे-फडणवीस सरकारमधीलच एक मंत्री अब्दुल सत्तार यांनी ते उघडपणे सांगितलेच आहे. मात्र, त्यांनी हे कार्यकर्ते कोण आहेत आणि नेते कोण आहेत हे देखील सांगायला पाहिजे, अशा प्रकारचे वक्तव्य एकनाथ खडसे यांनी अब्दुल सत्तार यांनी केलेल्या वक्तव्य वर केले आहे. भुसावळ तालुक्यात राखेच्या बंडाच्या कामात तत्कालीन ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकर्त्यांनी कामे घेतल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. शिवाय काम न करता बिले काढली गेली असल्याच्या तक्रारी सुद्धा आहेत. या प्रकारची चौकशी व्हायला पाहिजे. यांच्या चौकशीसाठी आपण राज्य सरकारकडे पाठ पुरावा करणार आहोत, असेही खडसे म्हणाले. ही चौकशी होऊन त्यात जे काय समोर येईल ते जनतेसमोर आले पाहिजे आणि दोषी असणाऱ्यांवर योग्य ती कारवाई व्हायला पाहिजे, अशी मागणी एकनाथ खडसे यांनी यावेळी केली आहे.

## शेकापचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे यांचे निधन


आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** मराठवाड्याची मुलुखमैदानी तोफ अशी ओळख असलेले शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे यांचे निधन झाले आहे. ते १०२ वर्षांचे होते. धोंडगे यांच्यावर औरंगाबादमधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या निधनाने सर्वसामान्य जनतेच्या समस्यांसाठी लढणारा लढवय्या नेता हरपला अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. केशवराव धोंडगे हे प्रदीर्घकाळ विधिमंडळाचे सदस्य राहिलेले आहेत. त्यांनी विधानसभेबरोबरच लोकसभेतही जनतेचे प्रतिनिधीत्व केले आहे. केशवराव धोंडगे हे ५ वेळा आमदार म्हणून विधानसभेत निवडून गेले होते. तसेच एक वेळा ते लोकसभेची निवडणूकही जिंकले होते. सर्वसामान्य जनतेच्या समस्या ते सभागृहात पोटतिडकीने मांडत असत. विधानसभेत त्यांची अनेक भाषणे गाजली आहेत. ते निर्भिड आणि स्वाभिमानी बाण्याचे जनप्रतिनिधी होते. केशवराव धोंडगे यांनी आणीबाणीच्या लढ्याचेही नेतृत्व केले होते. नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात ते १४ महिने कारावासात होते. यातून महाराष्ट्राचा त्यांचा लढाऊ आणि स्वाभिमानी बाणा दिसला होता.




# आँखोंसे जो उतरी हैं दिलमें ...




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

माझ्यासाठी वाचन हा दिव्यानंदाची अनुभूती देणारा अनुभव आहे. एखादी छान पौर्णिमेची रात्र असावी आणि खिडकीतून चांदणं आत झिरपत यावं तसा शांत, दिव्य आणि प्रसन्न अनुभव वाचन आपल्याला देतं. या प्रसन्न अनुभवाचं माध्यम असतं एखादं आवडतं पुस्तक, कथा किंवा कविता. डोळ्यांच्या मार्गानं हे चांदणं थेट आतपर्यंत झिरपतं आणि आत्मानंदाचा प्रसन्न अनुभव देतं . एखाद्या पट्टीच्या गायकाला जसा मैफलीत सूर गवसावा आणि मैफल उत्तरोत्तर रंगत जावी तसाच हा अनुभव असतो. या मैफलीत श्रोते जसे सुरांच्या वर्षावाने सचैल न्हाऊन निघतात, तसाच आनंद चांगल्या पुस्तकाचं वाचन आपल्याला देतं. बरं हे वाचन आणि त्याचे प्रकारही वेगवेगळे. मार्ग वेगवेगळे आणि माध्यमही वेगवेगळे. पण परिणाम मात्र एकच असतो आणि तो म्हणजे आनंदाची अनुभूती. जेव्हा मी माझ्यासाठी वाचतो, तेव्हा पुस्तकातील ती अक्षरे अमूर्त रूप धारण करून डोळ्यांच्या खिडकीवाटे थेट मनाच्या गाभाऱ्यात प्रवेश करतात. येताना ती अक्षरे एकेकटी येत नाहीत. ते आपल्यासोबत आनंद, प्रसन्नता कणाकणाने घेऊन आत शिरतात. काळोख्या रात्रीत जसे एखाद्या काचेच्या बरणीत काजवे एकत्र गोळा करावेत आणि ती काचेची बरणी प्रकाशमान व्हावी, तिचा प्रकाश आपल्या चेहऱ्यावर पडावा आणि आपला चेहरा काळोखातही उजळून निघावा तसेच वाचन माझ्या अंतरंग प्रकाशाने भरून टाकते. मनाचा कोपरा न कोपरा उजळून निघतो. उन्हाळ्यात तहानलेल्या धरणीवर जसे पावसाचे थेंब पडावेत आणि थोड्याच वेळात आपल्या शीतलतेने त्यांनी धरित्रीला शांत करावे तसे उत्तम वाङ्मय मनाच्या तहानलेल्या धरणीवर अमृताचे सिंचन करते. मग उन्हाने कोमेजलेले, करपलेले अंकुर टवटवीत होऊन वर येतात आणि ते 'हिरवे हिरवे गार गालिचे' मनाला प्रसन्नता आणि शांतता देतात. जेव्हा एखादे बुवा, पुराणिक, कथाकार, कीर्तनकार आपल्या रसाळ वाणीद्वारे रामायण, भागवत, हरिविजय, पांडवप्रताप यासारखा एखादा ग्रंथ श्रोत्यांसमोर वाचतात, तेव्हा ते स्वतःबरोबर इतरांनाही आनंदाची अनुभूती देतात.



**क्रमशः**



## आनंदी पहाट

# पर्यावरणपूरक घरबांधणीची गरज

आधुनिक केसरी

महानगरांचा चौफेर होत जाणारा विकास, औद्योगिकीकरण, मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड, वाढत जाणारी लोकसंख्या, प्रदूषण अशा अनेक कारणांमुळे पर्यावरणाचा समतोल राखणं सर्वच ठिकाणी शक्य होत नसल्याचं दिसून येत आहे. यामुळे वीज, पाणी पुरवठा, रस्ते, निवासव्यवस्था, शुद्ध हवा या सर्वांवर कमी अधिक प्रमाणात परिणाम होत असताना आपण पाहत आहोत. महानगरांमध्ये अनेक ठिकाणी उभ्या होत असलेल्या टोलेजंग इमारती, मोकळ्या जागांचा, बागांचा, क्रीडांगणांचा अभाव यामुळे वीज, पाणी, निवासव्यवस्था, शुद्ध हवा अशा अनेक मूलभूत गरजांवर मर्यादा येत असल्याचं आपल्याला बघायला मिळत आहे. वाढत जाणाऱ्या लोकसंख्येबरोबर मूलभूत गरजा देखील वाढत जातात. त्याचा ताण शासकीय व्यवस्थेवर येतो. पाण्याचा वापर जसा वाढत असतो तसाच त्याच्या वापरामुळे सांडपाणी आणि मैला-पाणी वाहून नेण्याची व्यवस्था देखील वाढवावी लागते. पाणी पुरवठ्यासाठी बोअर वेल, टाकी व पंपाची व्यवस्था करता येते मात्र तयार होणारे सांडपाणी शहराच्या मैला-पाणी वाहून नेणाऱ्या व्यवस्थेत सोडावे लागते. कचरा संकलनाचीही वेगळी व्यवस्था करावी लागते. हल्ली नव्यानं बांधल्या जात असलेल्या निवासी संकुलात कचरा संकलन करून त्याद्वारे खत निर्मिती आणि निर्मूलन करणे अनिवार्य झालं आहे. पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी, अनावश्यक खर्च कमी करण्यासाठी, उपलब्ध नैसर्गिक साधन सामुग्रीचा वापर करून पर्यावरण पूरक घर बांधणी आणि त्याची अंतर्गत सजावट होणं ही काळाची गरज झाली आहे. पर्यावरण पूरक घर ही संकल्पना सद्यःस्थितीत अंतर्गत संरचनेचा अविभाज्य घटक बनत आहे. ईको-फ्रेंडली या नावाने सर्वश्रूत असणाऱ्या या संकल्पनेला प्राधान्य देण्यामागे अनेक महत्वाच्या बाबी आहेत. घराच्या बांधकामासाठी तसेच त्याच्या अंतर्गत सजावटीसाठी लागणारे घटक अथवा लागणारा माल निवडताना पर्यावरणाचा अभ्यासपूर्वक विचार होणं आवश्यक असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## तुझ्या चरणाशी | ठाव दे गा ||

कृपाळू जगाचा | विठु माझा बाप ||
त्यासी कैसी थाप | मारी वेड्या ||१||
त्रैलोक्याचा स्वामी | समदृष्टी पाहे ||
भार सारा वाहे | वैष्णवांचा ||२||
निष्ठावंत भक्ता |तारन्या तत्पर ||
उभा निरंतर | विटेवरी ||३||
त्याच्या कृपे होय | आत्मबोध ज्यास ||
तेच संत खास | रूप त्याचे ||४||
'मी'पण निमाले | आता ऋषिकेशी ||
तुझ्या चरणाशी | ठाव दे गा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी


**देवाचे अस्तित्व नाकारताना किंवा स्वीकारताना एक विचार अवश्य करा- माझे अस्तित्व मी परिपूर्णपणे जाणले आहे काय?**

**एक वेळ श्वासाची आस सोडा, पण ध्येयाची कास सोडू नका. मात्र तुमचे ध्येय तुमचा अभिनिवेश होता कामा नये. जीवनातील प्राधान्यक्रमाची परिवर्तनीयता स्मरणात असू द्या.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# उत्कट भावनेने भगवंताची उपासना करावी




आधुनिक केसरी

विस्तव माहीत नसला, तरी तो हाताला चुकूनही लागला तरी हात भाजतो; किंवा हा परीस आहे हे माहीत नसूनही, लोखंडाचा घण त्यावर मारला तरी त्याचे सोने व्हायचे रहात नाही. त्याप्रमाणे ज्ञानाशिवाय नुसते भक्तीने जरी भगवंताकडे गेले तरी काम होते. परंतु दुसऱ्या विषयांची आसक्ति जोवर आपल्याला सुटत नाही, तोवर मनापासून भगवद्‌भक्ति होत नाही. जिथे उत्कट भावना आहे तिथे सगुण मूर्तीला मनुष्यधर्म प्राप्त होतील. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्तीमध्ये त्याला जिवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. शिवाय, जे इतर लोक थोडे तन्मय झाले आहेत, त्यांनादेखील तो अनुभवाला येईल. परंतु उपासकाची किंवा भक्ताची भावना नेहमी उत्कट राहीलच असा नेम नाही. म्हणून अशा उपासकाला मूर्तीमधल्या चैतन्याचा अनुभव येऊन देखील पारमार्थिकदृष्ट्या फायदा होईलच असे निश्चित नाही. एका मुलाने काही खोडी केली म्हणून शेजारच्या बाईने त्याला एक चापट मारली. त्याबरोबर त्या मुलाने मोठे भोकाड पसरले आणि त्या बाईला शिव्या देऊ लागला. ते ऐकून त्याची आई बाहेर आली आणि तिने त्याला चांगलाच झोडपला. परंतु आईच्या हातचा इतका मार खाऊनसुद्धा तो मुलगा फार ओरडला नाही, आणि त्याने आईला उलट शिव्यापण दिल्या नाहीत. हे जसे खरे, त्याप्रमाणे आपल्यावर येणारी संकटे ही भगवंताने आणली आहेत अशी निष्ठा असेल, तर आपल्याला त्यांचा त्रास होईल, पण त्यांनी आपली शांति बिघडणार नाही. भगवंताचा विसर आपल्याला पडला की आपली शांति बिघडते. ज्या दातांनी सिंह मोठाले प्राणी मारतो त्याच दातांनी तो आपल्या पिल्लांना इजा न करता उचलतो, हे लक्षात असू द्यावे. आपण निःपक्षपाती बुद्धीने विचार केला तर भगवंताचे सान्निध्य लाभले त्यालाच निर्भयता आणि निर्वासनता येईल. प्रत्येक माणसाला आधार लागतो. पण आपण अपूर्णाचा आधार धरल्यामुळे आपल्याला निर्भयता येत नाही; यासाठी भगवंताचा आधार धरावा. बुद्धीने निश्चय करावा आणि मन भगवंताकडे लावावे, की इंद्रिये तिकडे बळजबरीने जातीलच, राम उपाधिरहित आणि त्याचे नामही उपाधिरहित आहे. म्हणून, ज्याप्रमाणे खडक किंवा वाळू पाण्याशी मिसळत नाहीत, साखर किंवा मीठच विरघळते आणि समरस होते, तद्वत्‌ रामाशी त्याचे नामच समरस होते.

**आजचे बोधवचन आहे - सर्व सृष्टी रामरूप दिसणे हेच भक्तीचे फळ आहे.**

# मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**मनाची शते ऐकता दोष जाती।**
**मतीमंद ते साधना योग्य होती।**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी।**
**म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी।।२०५।।**

**श्लोकार्थ** :- हे मनाचे २०५ श्लोक श्रवण केले तर दोष जातील. अज्ञानी माणसे साधन करण्यास योग्य होतील. त्यांच्या अंगी ज्ञान, वैराग्य व सामर्थ्य चढेल. श्रीसमर्थ म्हणतात की त्यांना खात्रीने मुक्ती मिळेल.

**विवेचन** : - मागील श्लोकांत मनोबोध सांगून संपला. आता या शेवटच्या श्लोकात समर्थ आपल्याला या मनाच्या श्लोकांच्या श्रवणाचे फळ सांगत आहेत. या शेवटच्या श्लोकाचा पहिला चरण आणि शेवटच्या चरणात सांगितलेले गुण श्रोत्यांनी आत्मसात केले तर मधील दोन चरणात सांगितलेले फळ त्यांना विनासायास प्राप्त होईल असे समर्थ आपल्याला सांगतात. जन्म झाल्यावर मनुष्य सर्वात पहिले ऐकायला शिकतो. मनुष्याचे शिक्षण त्याक्षणा पासून सुरू होते आणि ते मरे पर्यंत निरंतर चालू रहाते, रहावे....!

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

समर्थ म्हणतात,
"श्रवणाचा विचार कळे। तरीच भाग्यश्री प्रबळे। मुख्य परमात्मा आकळे। स्वानुभवासी॥"
समर्थांना नुसते श्रवण म्हणजे ऐकणे अपेक्षित नसावे तर श्रवण म्हणजे ऐकून त्यानुरूप कृती करणे अपेक्षित असावे.
"अर्थांतर पाहिल्यावीण। उगेंचि करी जो श्रवण। तो श्रोता नव्हे पाषण। मनुष्यवेषें॥"
नुसते वाचून उपयोग नाही, तर त्याचा मतितार्थ लक्षात घेऊन, दैनंदिन जीवनात त्याचे अवलंबन करून आपले जीवन उन्नत करणे समर्थांना अभिप्रेत असावे. सर्व संतांना असेच वाटत असावे, त्याशिवाय त्यांच्याकडून जनउध्दार होऊ शकणार नाही. परमात्मप्राप्तीसाठी सर्वसामान्य मनुष्याला सर्व संतांनी सुलभ असा भक्तिमार्ग सांगितला आहे. आजपर्यंत भक्तिमार्गाने जाऊन अनेक साधकांनी प्रपंचालाच परमार्थात रुपांतरीत केले आहे.
भक्तिमार्ग हाच सर्वसामान्य मनुष्यासाठी असे सर्वश्रेष्ठ आहे सर्व संत सांगतात, म्हणून कोणीही त्याचे आचरण केले तर त्याला उचित फळ मिळाल्याशिवाय राहणार नाही असे समर्थ आपल्याला तिसऱ्या चरणात सांगतात. समर्थांनी मनाचे श्लोक लिहिले त्यासंबंधी एक कथा सांगितली जाते. ती कथा आहे उत्सवाला शिधा न मिळाल्याची. माझ्यामते त्या कथेपुरते मनाच्या श्लोकांचे प्रयोजन नक्कीच नसेल. लोककल्याणाची तळमळ असलेले संत कोणतीही गोष्ट जरी एखादे निमित्त म्हणून करीत असले तरी त्यांचा अंतःस्थ हेतू जनकल्याण असाच हाच असतो,असे आपल्या लक्षात येईल. समर्थकालीन परिस्थिती म्हणजे मोगलाई. मोगलाई हा शब्दच मोगलाईची दाहकता दर्शविणारा आहे. मनुष्य मनाने हरला तर त्याला कोणीही जिंकू शकते. म्हणून मन बळकट करण्यासाठी, स्वाभिमान जागृत करण्यासाठी मनाच्या श्लोकांचे प्रयोजन असावे असे म्हणता येते. मनालाच शिकवण का याचे अत्यंत सोपे उत्तर खाली ओळींमध्ये मिळते."रण जिंकून नाही जिंकता येत मन | मन जिंकल्याशिवाय नाही जिंकता येत रण||"* (मा. अटलबिहारी वाजपेयी)
नुसते मनाला खंबीर करून पुरेसे होतेच असे नाही, त्यासाठी मनुष्याच्या अंगी वैराग्य बाणावे लागते. वैराग्य अंगी बाणण्यासाठी नामस्मरण अत्यंत उपयोगी होऊ शकते. समर्थ म्हणतात, "म्हणौन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य । रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ॥" या सर्व श्लोकांत समर्थांनी प्रयत्नपूर्वक देहबुद्धीचा समूळ नाश करायला सांगितला आहे आणि त्यासाठी सोपा मार्ग सांगितला आहे, तो म्हणजे सत्संग. हा सत्संग मानसिक, शाररिक, वाचिक (संतांचे ग्रंथ) किंवा सदेह संतांचा सहवास असा विविध प्रकारचा असू शकतो. परमार्थ प्राप्ती ही परिस्थिती निरपेक्ष असते. कारण परमार्थ साधना हा अंतरीचा प्रवास आहे, बाह्य स्थितीचा त्यावर परिणाम होऊ देऊ नये, त्यासाठी साधकाने मनाचे श्लोकांचे पठण नित्य करावे.























मा. वसंत मुंडे साहेब, प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या वाढदिवसानिमित्त आधुनिक केसरीने प्रकाशित केलेल्या विशेषांकाचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.





मा. वसंत मुंडे साहेब, प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या वाढदिवसानिमित्त पाचोड येथे पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना राजूनाना भुमरे, मार्केट कमिटी सभापती, पैठण, राहुल नारोळे, गोविंद चावरे, अनिल भुमरे, अनिस कुरेशी, शिवनाथ हजारे, विष्णू भोजने आदी.




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई
















महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई
मा.श्री.वसंत मुंडे











# राहुल गांधींचं टीकास्त्र

आधुनिक केसरी

अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमध्यील यांगत्से सीमाभागात चिनी सैनिक आणि भारतीय लष्कराच्या जवानांमध्ये ९ डिसेंबरला झटापट झाली होती. यामध्ये दोन्ही देशांचे सैनिक जखमीही झाले होते. यावरून कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. केंद्र सरकारचे चीन धोरण पूर्णपणे चुकले आहे. सरकारकडून लष्कराच्या मागे लपून स्वतःच्या बचावाचा प्रयत्न होत आहे. पण, सीमेवर काय घडलं ते सर्वांना सांगा, असे आव्हान राहुल गांधींनी केंद्र सरकारला दिले आहे. राहुल गांधींनी ३१ डिसेंबरला प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. तेव्हा राहुल गांधींनी चिनी घुसखोरी, 'भारत जोडो यात्रा' आणि अन्य प्रश्नांवर भाष्य केले. राहुल गांधी म्हणाले, "माझे वडील, आजी दोघेही शहीद झाले आहेत. हे दुःख भाजपाला समजणार नाही. कारण, त्यांच्या कुटुंबातील कोणाचीही हत्या झालेली नाही. सीमेवर देशाच्या रक्षणासाठी तैनात असलेल्या प्रत्येक भारतीय जवानावर मी प्रेम करतो. त्यांच्यापैकी एकही जवान शहीद होऊ नये, असे मला वाटतं." मी सरकारबद्दल काही भाष्य केले, तर लष्कराविरोधात बोललो असल्याचं सांगत दिशाभूल करण्यात येते. कॉंग्रेससह अन्य विरोधी पक्ष केंद्र सरकारच्या पाठिशी आहेत. पण, चिनी घुसखोरी केल्याचे मान्य करत, चुकांची कबुली दिली पाहिजे. घुसखोरी झाली नसल्याचा दावा केल्याने चीनचं फावलं आहे," असे सांगते "चीन आणि पाकिस्तान आपल्याविरोधात एकत्र येत आहे," असा दावाही राहुल गांधींनी केला आहे. कॉंग्रेसची 'भारत जोडो' यात्रा पंजाब आणि काश्मीर सारख्या संवेदनशील भागातून जाणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर राहुल गांधींच्या सुरक्षेत त्रुटी असल्याचे सांगत कॉंग्रेसने गृहमंत्रालयाला पत्र लिहले होते. त्यावर सीआरपीएफकडून सांगितलं गेलं की, राहुल गांधींनी २०२० पासून ११३ वेळ सुरक्षा कवचाचे उल्लंघन केले आहे. यावरही राहुल गांधींनी भाष्य केले. "भारत जोडो ही पदयात्रा आहे. ती बुलेटप्रुफ कारमध्ये बसून कशी केली जाणार. मात्र, केंद्र सरकारकडून माझ्याविरुद्ध मुद्दा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भाजपाचे नेते रोड शो करतात तेव्हा नियम आडवे येत नाही," असा सवाल राहुल गांधींनी उपस्थित केला आहे.



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

# संघाचे मुख्यालय, त्याचे पावित्र्य आणि राजकारण !

आधुनिक केसरी

**नागपूर मध्ये १९२५ साली एका द्रष्ट्या पुरुषाने हिंदू समाजाचे संघटन करण्याची भीष्मप्रतिज्ञा घेतली , ते संघटन पुढे रा. स्व. संघ नावारूपास आले आणि आता तर त्याची शताब्दी जवळ आली आहे. संपूर्ण भारताचे नव्हे जगाचे लक्ष वेधून घेणारे हे हिंदू संघटन आज भारतात सर्व तालुक्यात हजारो खेड्यात / शहरात पसरले आहे आणि संपूर्ण विश्वात हिंदु स्वयंसेवक संघटन म्हणून हे संघटन कार्यरत आहे.**

सुमारे १,४०, ००० च्या वर सेवाकार्य उभे करून समाज परिवर्तनाचा रथ आपल्या परीने संघ ओढत आहे. समाजावर येणाऱ्या आपत्ती काळात मदतीला धावून जाणारी नित्य शक्ती म्हणून संघ सिद्ध होत आहे. संघाचे प्रथम सरसंघचालक आणि संस्थापक पूजनीय डॉ केशव बळीराम हेडगेवार याना पाहिलेले जवळ जवळ कुणी आज जिवन्त नाही आणि द्वितीय सरसंघचालक पूजनीय गुरुजी याना पण बघणारे आणि आज असणारे कार्यकर्ते हाताच्या बोटावर मोजण्याइतके असतील !




अर्थात तरी पण या दोघांची नित्य प्रेरणा संघकार्यकर्त्यांना ऊर्जा देत असते , बिकट परिस्थीती मध्ये मार्ग दाखवत असते आणि आजच्या कार्यकर्त्यांना एका अर्थाने क्रियाशील ठेवत असते. नागपूर ही त्या अर्थाने आम्हा सर्व कार्यकर्त्यांची पंढरी !डॉ. हेडगेवार यांनी स्वतःच्या अस्तित्वाची कुठलीही खूण मृत्यूनंतर संघ कार्यात अडथळा बनू नये ही काळजी घेतली पण त्यांच्यावर असणारी स्वयंसेवक , कार्यकर्त्यांची अनन्य साधारण निष्ठा यातून डॉक्टर हेडगेवार यांचे स्मारक स्मृती मंदिराच्या रूपाने उभे राहिले. पूजनीय गुरुजी यांनी तर लिहूनच ठेवले होते माझे कुठले स्मारक उभे करू नका ! स्वतःचे श्राद्ध पण त्यांनी आधीच करून ठेवले होते ! पण त्यांच्या स्मृती जाग्या राहव्या आणि स्वयंसेवकाना प्रेरणा मिळत राहावी म्हणून त्यांच्या जीवनाला योग्य असे अग्निकुंड आणि त्यावर राष्ट्राय स्वाहा , इदम् न मम् ! हे अर्थपूर्ण शब्द लिहले गेले.हे स्मृतीमंदिर , समाधी स्थळ उभे करण्यासाठी स्वयंसेवकांनी अर्थसहाय्यता केली कुठले ही सरकारी अनुदान त्यासाठी संघाने मिळवले नाही . सर्वार्थाने त्याचे पावित्र्य संघाने टिकवले आहे. संघाचे पूर्व सरकार्यवाह कै . हो. वे. शेषाद्री ध्यानमग्न स्थितीत समाधी समोर बसलेले आजही आठवते तेंव्हा अंगावर रोमांच उभे राहते . कन्याकुमारी ते काश्मीर आणि कटक ते कच्छ येथून येणारे तृतीय वर्षाचे स्वयंसेवक संध्याकाळच्या संघस्थाना नंतर तेथे जाऊन दर्शन घेतात आणि आपल्या प्रेरणा दृढ करतात हे दृश्य शब्दातीत आहे. नागपूर ला जाणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाला तेथे जाण्याची आणि दर्शन घेण्याची ओढ लागलेली असते किंबहुना प्रत्येक आसेतु हिमालय भारतात असणाऱ्या स्वयंसेवकाची मनोमन धारणा असते एकदा तरी या ठिकाणी जाऊन दर्शन घेण्याची. तेथे जाऊन सेल्फी घेणे , फोटो घेणे या पेक्ष्या या दोन महापुरुषांचे दर्शन घेणे , तेथील माती कपाळी लावणे आणि आपल्या जीवनात काही अंशी का होईना त्यांचे अनुकरण करणे हा त्या मागचा मुख्य उद्देश असतो. अलीकडच्या काही वर्षात रतन टाटा , महिंद्रा यासारखे उद्योजक , अनेक फिल्मी अभिनेते , अभिनेत्री , खेळाडू स्मृतिमंदिरात येतात दर्शन घेतात . मिथुन चक्रवर्ती सारखा नक्षल वादी चळवळीत एकेकाळी असणारा अभिनेता पण जेंव्हा डॉक्टर हेडगेवार यांच्या पुढे नतमस्तक होतो तेव्हा काळाचा महिमा या शब्दाचा अर्थ कळतो . अनेक परदेशी पाहुणे पण येतात , संघ समजावून घेण्याची त्यांची इच्छा असते !

पण , सामाजिक जीवनात हल्ली काही विषाणू पसरले आहेत आणि त्यातून साथीचे रोग पसरत आहेत . आपल्या नेत्याप्रती निष्ठा प्रगट करण्यासाठी त्याचे वाढदिवस , त्याचे लग्नाचे वाढदिवस आणि बऱ्याच गोष्टीत त्याचे फोटो , त्याचे आपल्या बरोबरचे फोटो टाकून अनुनय करण्याची वृत्ती वाढत आहे. महापुरुषांना एका पोस्टमध्ये श्रद्धांजली, अभिवादन करणारे बहुतांशी मंडळी दुरुनही त्यांच्या जीवनाशी मिळते जुळते काकण भरही वागत नसतात . अशा महापुरुषांचा खडतर , प्रेरणादायी जीवन प्रवास २४ तासाचे स्टेट्स , स्टोरी आणि ट्विटर यामध्ये बंदिस्त करण्याची पद्धत अलीकडे वाढली आहे. नागपूरच्या संघाच्या मुख्यालय आणि पूजनीय डॉ , गुरुजी यांच्या समाधीचे दर्शन यातही हल्ली राजकीय पर्यटन वाढले आहे . त्याचे मग वेगवेगळे अर्थ त्यावर प्रतिक्रिया सुरू झाल्या आहेत . सध्या नागपूर येथे अधिवेशन चालू आहे त्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्मृती मंदिराला भेट देण्यास आल्याचे अनेकांना झोंबले आणि मग राष्ट्रीय प्रवक्ते आणि त्यांचे नेते यांनी अगदी मिरच्या , लिंबू पर्यंत प्रतिक्रिया दिल्या. त्यावर लगेच भाजप नेत्याने हिरवी उलटी वगैरे प्रतिक्रिया दिली !

आपल्या मुर्खपणाने आणि वाह्यात वक्तव्याने पक्षाला अडचणीत आणणाऱ्या महाभाग प्रवक्त्याला शिंदे स्मृती मंदिरात गेले हे रक्तांतर वाटले . पक्षीय विद्वेष आणि सत्तेचा हव्यास अन्य पक्षीयांचे रक्त वेगळे मानायला लागला आहे. हिंदुत्वाच्या वलग्ना करणाऱ्या पक्षाने आधी एकात्म हिंदू समाजाची संकल्पना समजून घेण्याची गरज आहे . प्रबोधनकार ठाकरे यांचे वारस म्हणवणारे आणि आमचे हिंदुत्व जानवे , शेंडीतले नाही अशी शेखी मिरवणाऱ्या (जागतिक नेत्यांच्या मांडीला मांडी लावून बसणारे ) ( ???? ) नेत्याला थेट लिंबू, मिरच्या, जादू टोणा आठवले. ते विसरून गेले आहेत की ९७ वर्षात सगळे प्रयोग संघाने पचवले आहेत आणि त्यामुळेच संघ वर्धिष्णू आहे ! संघ कुठलेही पुरोगामी अवडंबर माजवत नाही पण संघ असल्या कुठल्याही लिंबू मिर्ची प्रयोगावर विश्वास ठेवत नाही.

या सगळ्या राजकीय पर्यटनात त्या जागेचे पावित्र्य , त्या बद्दल स्वयंसेवकांचा असलेला श्रद्धाभाव याचे आपण नुकसान करत आहोत याचे भान या राजकीय मंडळींनी लक्षात घेण्याची गरज आहे . संघाने तेथे येऊन स्मृती स्थळाचे दर्शन घेण्यापासून कोणालाही रोखलेले नाही . कुठल्याही पक्षाचा नेता तेथे येऊ शकतो पण केवळ पोलिटिकल मायलेज म्हणून कुणी असे करू पाहत असेल तर संघ स्वयंसेवक आणि हिंदू समाज आता इतका अपरिपकव राहिलेला नाही हे तेथे न येणाऱ्या आणि कुणी गेले म्हणून ज्यांच्या पोटात दुखत आहे त्यांनी पण लक्षात घेण्याची गरज आहे. संघाच्या शीर्ष नेतृत्वाने कधी ही कुठल्या कर्मकांडाचा पुरस्कार केलेला नाही आणि संघ , संघाच्या वास्तू या मठ, गादी या अर्थाने संकुचित चौकटीत बंदिस्त ठेवलेल्या नाहीत. सुदूर वनवासी भागात , खेड्यात निष्ठेने शाखा लावणारा असामान्य व्यक्तिमत्वाचा पण लौकिक सामान्य स्वयंसेवक हा आपल्या पूर्ण आयुष्यात नागपूरला कदाचित जाऊ पण शकत नाही पण आपल्या रक्त आणि स्वेद याच्या सिंचनातून तो आपल्या गावातच स्मृती मंदिर उभे करतो , जेथे असंख्य बिन चेहऱ्याचे कार्यकर्ते डॉ . हेडगेवार यांच्यासारखे भासतात आणि ज्यांचे जीवन पूजनीय गुरुजी यांच्यासारखे म्हणजे अग्निकुंडासारखे असते . ते पूजनीय गुरुजी , डॉ .यांचा जप करत नसतात पण ते जपत असतात ओळी राष्ट्राय स्वाहा , इदम न मम् ! या भावनेच्या ! अलीकडील काळात हिंदुत्व हा विचार लोकप्रिय होत असताना त्यातील खोली समजून घेताना त्याला सवग लोकप्रियतेचे आणि राजकीय हत्याराचे स्वरूप येऊ घातले आहे . ते थांबवण्यासाठी आणि हिंदुत्व सर्वस्पर्शी , सर्वव्यापी करण्यासाठी त्याच्या राजकीय आशयावर किती फोकस करायचा आणि मूलभूत सामाजिक आशयावर किती भर द्यायचा याचे संतुलन आणि भान स्वयंसेवक आणि कार्यकर्ते यांनी राखले तर कदाचित असे प्रसंग कमी उदभवतील असे वाटते.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

आधुनिक केसरी

**भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज पुण्यतिथी आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते.**

विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लॉंच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लॉंचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो ) ची स्थापना झाली.



आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# एक खासदार एक पेन्शन लागू करणार का ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**सध्या परिस्थिती अशी आहे की, एखादी व्यक्ती कोणत्याही कालावधीसाठी खासदार झाली तर त्याला पेन्शन मिळू शकते. खासदार-आमदारांना मिळणारी पेन्शन हा अनेक दिवसांपासून वादाचा केंद्रबिंदू आहे. हे प्रकरण सुप्रीम कोर्टातही पोहोचले, पण एका एनजीओची याचिका त्यांनी धोरणात्मक निर्णय म्हणत फेटाळून लावली. पण पंजाबचे नवे मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांनी एक अभूतपूर्व पाऊल उचलले आणि राज्यात एक आमदार एक पेन्शन योजना लागू करून राजकीय पक्ष आणि नेत्यांना अडचणीत आणले.**

पंजाब सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह आहे कारण राज्यातील माजी आमदारांना दरमहा पाच ते सहा लाख रुपये पेन्शन मिळत होती . राज्य सरकारच्या या पाऊलामुळे सरकारी तिजोरीला नक्कीच मोठा दिलासा मिळणार आहे. इतर राज्यांमध्येही माजी आमदारांसाठी अशीच पेन्शनची तरतूद आहे. एक खासदार वन पेन्शन योजना त्याचप्रमाणे, माजी खासदारांसाठी वेतन, भत्ते आणि संसद सदस्यांचे निवृत्ती वेतन अधिनियम, 1954 अंतर्गत पेन्शनची तरतूद आहे. पूर्वीचा नियम असा होता की जर एखाद्या खासदाराने चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला तर तो पेन्शनचा हक्कदार मानला जायचा, पण २००४ मध्ये कायद्यात सुधारणा करून ही तरतूद काढून टाकण्यात आली . या कायद्यात अनेक वेळा सुधारणा करण्यात आल्या असून त्याआधारे माजी खासदार आणि त्यांच्या कुटुंबीयांना सर्व सुविधा देण्याची तरतूदही समाविष्ट करण्यात आली आहे.


सध्या परिस्थिती अशी आहे की, एखादी व्यक्ती कोणत्याही कालावधीसाठी खासदार झाली तर त्याला पेन्शन मिळू शकते. पंजाब सरकारच्या या निर्णयानंतर स्वच्छ आणि भ्रष्टाचारमुक्त सरकार देण्याचा दावा करणारी अन्य राज्यांची सरकारेही असे पाऊल उचलतील का, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. पंजाबच्या या पावलाने प्रभावित झालेली राज्य सरकारे आणि संसद त्यांच्या माजी सदस्यांना, आमदाराला किंवा खासदाराला पेन्शन देण्याचे धाडस करतील का ? सध्याच्या व्यवस्थेनुसार आमदार आणि खासदारांचे पेन्शन त्यांच्या कार्यकाळानुसार ठरते. इतकेच नव्हे तर आमदार आणि नंतर खासदार झालेल्या माननीयांना दुप्पट पेन्शन तर मिळतेच, पण त्यांच्या कार्यकाळानुसार त्यात वाढही होते. जर एखादी व्यक्ती राज्यसभा आणि लोकसभा या दोन्ही सभागृहांचा सदस्य असेल तर त्याला दोन्ही सभागृहांच्या माजी खासदाराचे पेन्शन मिळते. ज्या देशात वृद्धापकाळाची पेन्शन फक्त दोन हजार रुपये आहे, त्या देशात पत्रकारांना भविष्य निर्वाह निधी योजनेंतर्गत मिळणाऱ्या पेन्शनची किमान रक्कम केवळ नऊशे रुपये दरमहा असते, हे किती हास्यास्पद वाटते, पण माजी खासदार आणि आमदारांना लाखो रुपये मिळतात. दर महिन्याला सर्व सुविधांसह रुपये पेन्शन स्वरूपात मिळतात. माजी खासदार किंवा आमदार यांचा मृत्यू झाल्यास, हा लाभ त्याच्या/तिच्या जीवनसाथी/आजीवन आश्रितांना दिला जातो. आतापर्यंत पंजाबमधील आमदारांना त्यांच्या प्रत्येक कार्यकाळानुसार पेन्शन मिळत असे जे लाखो रुपये होते पण आता पंजाब सरकारने हे धोरण बदलले आहे. नवीन धोरणानुसार राज्यातील आमदारांना अनेक टर्म सभागृहाचे सदस्य राहिल्यानंतरही त्यांना दरमहा केवळ ७५ हजार रुपये पेन्शन मिळणार आहे. खासदार आणि आमदारांसाठी पेन्शन योजना सुरुवातीपासूनच वादाच्या केंद्रस्थानी आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या तुलनेत आजी-माजी खासदार-आमदारांना आयुष्यभर मिळणारी पेन्शन आणि इतर सुविधा हे त्याचे एक कारण आहे. आमदारांना मिळणाऱ्या पेन्शनमुळे राज्याच्या महसुलावर मोठा बोजा पडतो, कारण आमदारांना दरमहा पाच ते सहा लाख रुपये पेन्शन मिळत असल्याचे भगवंत सिंग मान यांचे म्हणणे आहे. खासदार-आमदारांच्या पेन्शनचा मुद्दा सातत्याने एक ना एक कोर्टात पोहोचत आहे. असेच एक प्रकरण अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. 16 एप्रिल 2018 रोजी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती जे चेलमेश्वर आणि न्यायमूर्ती संजय किशन कौल यांच्या खंडपीठाने लोकप्रहरीचे सरचिटणीस एस.एन. शुक्ला आणि इतर विरुद्ध भारत संघातील 20 पानांच्या निकालात, माजी खासदारांच्या पेन्शन प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला, तो विधिमंडळाच्या अधिकारक्षेत्राचा विषय आहे. सर्वोच्च न्यायालयाने या स्वयंसेवी संस्थेची याचिका फेटाळताना म्हटले होते की, आमचा विश्वास आहे की काही खासदारांची आर्थिक स्थिती चांगली असणे किंवा करोडो गरीब लोकसंख्येला विविध फायदे देणे किंवा त्यांच्यासाठी वाजवी तरतूद करणे, यामध्ये कोणतीही निवड किंवा निवड होत नाही. कायदेविषयक धोरण. बदल करण्यासारखे प्रश्न संसदेच्या कक्षेत येतात. ती न्यायाची बाब नाही. राष्ट्रपतींना पेन्शनचा लाभ देण्याच्या गरजेवर संविधान सभेत झालेल्या चर्चेचा संदर्भ देत न्यायालयाने सांगितले की, डिसेंबर 1948 मध्ये डॉ. आंबेडकरांनी खासदारांना निवृत्तीनंतर पेन्शनच्या कक्षेबाहेर ठेवायचे का, या प्रश्नावरही चर्चा केली होती. हवे होते. त्यामुळे ज्या फॉर्ममध्ये ही दुरुस्ती करण्यात आली आहे ती व्यावहारिक वाटत नाही, परंतु राष्ट्रपतींसह संसदेचे सदस्य म्हणून ठराविक काळ काम केलेल्या




सदस्यांना कोणत्या ना कोणत्या पेन्शनचा हक्क मिळायला हवा आणि भविष्यातील संसद नक्कीच पेन्शनचा हक्क बजावेल, असे ते म्हणाले होते. ही वस्तुस्थिती ओळखली जाईल. कोर्टाने कॉमन कॉज, रजिस्टर्ड सोसायटी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचाही संदर्भ दिला, ज्यामध्ये असे म्हटले आहे की माजी खासदारांसाठी पेन्शनबाबत कायदे करण्यास आणि त्यासाठी अटी घालण्यास विधिमंडळ सक्षम आहे. संसद सदस्यांचे वेतन आणि भत्ते कायद्यान्वये, माजी मृत सदस्याच्या पती/पत्नीला आणि त्याच्यावर अवलंबून असलेल्यांना देखील मृत सदस्याच्या मृत्यूच्या वेळी मिळालेल्या पेन्शनच्या 50 टक्के मिळण्याचा अधिकार आहे आणि ही पेन्शन आयुष्यभर जोडीदार. केरळसारख्या राज्यात मंत्री कार्यालयात केवळ दोन वर्षे काम केलेल्या कर्मचाऱ्यालाही आयुष्यभर पेन्शन दिली जात होती, तर दोन वर्षे किंवा दहा वर्षांच्या कंत्राटी सेवेनंतरही सर्वसामान्यांना ते शक्य होणार नाही. केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी या व्यवस्थेवर जोरदार टीका केली. ते म्हणाले होते की, राज्यातील प्रत्येक मंत्री आपल्या कार्यालयात दोन वर्षांसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतो आणि त्यानंतर त्यांची सेवा संपल्यानंतर त्यांना आजीवन पेन्शन मिळते. इतर सरकारेही असे पाऊल उचलतील का ? ही बाब नुकतीच सर्वोच्च न्यायालयात आली आणि सर्वोच्च न्यायालयाने या पेन्शन धोरणावर आश्चर्य व्यक्त करताना राज्याकडे निधीची कमतरता नाही, असे दिसते. न्यायमूर्ती एस अब्दुल नझीर आणि कृष्णा मुरारी यांच्या खंडपीठाने केरळ सरकारकडून दोन वर्षांसाठी राज्यातील मंत्र्यांनी नियुक्त केलेल्या व्यक्तींना पेन्शन कशी दिली जात आहे हे जाणून घेण्यास सांगितले. एवढेच नाही तर हा कर्मचारी काढून टाकल्यानंतर त्यांच्या जागी दोन वर्षांसाठी नवीन कर्मचारी येतो आणि तोही आजीवन पेन्शनचा हक्कदार असतो.

त्यामुळेच हा प्रसंग समोर आल्यानंतर साहजिकच प्रश्न पडतो की, देशातील आपल्या प्रियजनांना आजीवन पेन्शनची सुविधा देण्याचे हे संघटित रॅकेट तर नाही ना ? त्यांना आजीवन आर्थिक लाभ मिळतो. अर्थात, माजी खासदार आणि आमदारांना पेन्शन आणि भत्त्यांशी संबंधित कायदे आणि नियम बनवणे हे विधिमंडळाचे काम आहे, परंतु असा कोणताही निर्णय घेताना सामाजिक व्यवस्था आणि मिळालेली पेन्शन यांच्यात तर्कशुद्ध समतोल राखण्याची गरज आहे. नागरिकांकडून आणि माजी खासदार आणि आमदारांचे पेन्शन. पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या या पावलाने प्रेरित होऊन इतर राज्य सरकारेही अशी पावले उचलतील, जेणेकरून सरकारी तिजोरीवर कोणताही अतिरिक्त बोजा पडू नये आणि कपातीतून वाचलेली कोट्यवधी रुपयांची रक्कम कल्याणासाठी वापरता येईल.

# देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**30 डिसेंबर 1943 रोजी अंदमान या बेटावर इंग्रजांची सत्ता उलथवून आझाद हिंद फौजेने तिरंगा ध्वज लावला. अंदमान व निकोबार हे बेट स्वतंत्र झाले. आझाद हिंद फौजेचा हा पहिला विजय होता. त्यांना नेताजींनी शहीद व स्वराज हे नाव दिले. दीडशे वर्षांच्या इंग्रजांच्या गुलामगिरीत भारतीयांना फक्त इंग्रजांच्या सेनेमध्ये नोकरी करणे माहिती होते. देशातील राजे राजवाडे खालसा झाल्यामुळे सर्वसामान्य माणसाला आपला पराक्रम गाजविण्याची, सैनिक बनण्याची संधी अन्यत्र कुठेही उपलब्ध नव्हती.**

त्यामुळे एकतर इंग्रजांच्या सैन्यांमध्ये सामील व्हा अथवा सशस्त्र दलांपासून दूर राहा हाच काय तो पर्याय होता. जापान ने पर्लहार्बर ह्या बेटावर आपला ताबा मिळविला व त्यांनी ब्रह्मदेशामध्ये ही इंग्रजांचा पराभव केला. इंग्रजांच्या पराभवानंतर हजारो सैनिक बंदी झाले. या मध्ये जवळपास पंचेविस हजार भारतीय सैनिकांचा समावेश होता. नेताजी सुभाष चंद्र बोस जपानच्या पंतप्रधानांना भेटले व त्यांनी या सर्व सैनिकांना मुक्त करण्या ची विनंती केली. या पंचेवीस हजार सैनिकांना संबोधित करताना नेताजी त्यांना म्हणाले की मित्रहो आज पर्यंत आपण इंग्रजांची गुलामगिरी केली. आता चला आपण भारताच्या स्वातंत्र्याकरिता फौज उभारू. आणि येथूनच आजाद हिंद फौजेची मुहूर्तमेढ रोवल्या गेली. रासबिहारी बोस यांनी या फौजेची संपूर्ण जबाबदारी सुभाष चंद्र बोस यांच्यावर टाकली. जपानच्या संसदेमध्ये भाषण करताना सुद्धा नेताजींनी जपानी सांसादां समोर केलेल्या भाषणात त्यांना भारताच्या स्वातंत्र्याचा चे महत्व पटवून सांगितले. इंग्रजांच्या ताब्यातून ब्रह्मदेश मुक्त झाल्यानंतर त्यांच्या स्वातंत्र्यसमारंभात सुद्धा नेताजींचे भाषण झाले. ब्रह्मदेशाला त्यांनी आझाद हिंद फौजेसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनविले. जपानच्या टोकियो रेडिओ स्टेशन वरून सुद्धा नेताजींचे भाषण सर्वत्र प्रसारित झाले. रंगून येथील रेडिओ स्टेशनवर केलेल्या आपल्या भाषणात त्यांनी भारतीयांना तुम मुझे खून दो मै तुम्हे आजादी दूंगा. स्वातंत्र्य पाहिजे असेल तर आपल्या रक्ताचे मोल द्यावे लागेल अशा पद्धतीचा संदेश दिला. नेताजींचे व्यक्तिमत्व देशभक्ती नी भरलेले होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप सर्वच जनसामान्यांवर पडत होती. तरुणांचे थवेच्या थवे आझाद हिंद फौजेमध्ये सामील होण्याकरता येऊ लागले. यासाठी धनाची आवश्यकता होती. नेताजींनी ब्रह्मदेश, जपान व इतर देशातील भारतीयांना आझाद हिंद फौजे साठी धन समर्पण करण्याची आवश्यकता प्रतिपादित केली.गरिबातला गरीब व श्रीमंतातला श्रीमंत यांच्यामध्ये आपल्याजवळ असलेले सर्व आझाद हिंद फौजेसाठी समर्पित करण्याची स्पर्धा लागली. एका वृद्ध स्त्रीने तिचा पुत्र आझाद हिंद फौजेमध्ये गमावलेला होता. परंतु नेताजींची ही मागणी ऐकल्यावर तिने तिच्याजवळ असलेले सर्व चीज वस्तू आझाद हिंद फौजेला समर्पित केल्या. शेवटी आपल्या मुलाचा एक फोटो तिच्याजवळ होता तो सुद्धा तिने नेताजींना दिला व म्हणाली की मला अजून एक मुलगा असता तर तोही मी आझाद हिंद फौजे करीता दिला असता. आझाद हिंद फौजेमध्ये वेगवेगळ्या पद्धतीच्या रेजिमेंट बनविल्या गेल्या. काही दिवसांपूर्वी आपल्या भारतीय सैन्यांमध्ये महिलांना कायमस्वरूपी नोकरी बहाल करण्यात आलेली आहे. यामुळे महिला आता दीर्घकाळ सैन्यामध्ये आपली सेवा देऊ शकतील व मोठ्या पदावर सुद्धा पोहचू शकतील. परंतु आझाद हिंद फौजेमध्ये त्या काळामध्ये महिलांची एक राणी झाशी रेजिमेंट उभारण्यात आली व याचे नेतृत्व कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन यांच्याकडे होते. अनेक भारतीय राजकारणी लोकांनी नेताजी भारतावर आक्रमण करीत आहे. आतापर्यंत देश इंग्रजांचा गुलाम होता आता जपानी लोकांचा गुलाम भारताला बनविण्यासाठी नेताजी निघालेले आहेत. अशी त्यांच्या कार्याची निंदा केली. परंतु नेताजींनी जपानी फौजी सोबत जो करार केला होता त्यामध्ये त्यांनी सांगितले होते की भारताचा कुठलाही भूभाग आम्ही जिंकून घेतला तर त्या ठिकाणी जपानी झेंडा लागणार नाही तर आझाद हिंद फौजेचा झेंडा लागेल. जो भाग जिंकून घेतला जाईल तो भाग जपानच्या मालकीचा होणार नाही तर आझाद हिंद फौजेच्या मालकीचा होईल. जी संपत्ती मिळेल ती सुद्धा जपानची होणार नाही तर आझाद हिंद फौजेच्या मालकीची होईल. यावरून आपल्याला नेताजींच्या कार्याची दिशा व त्याचे स्वरूप लक्षात येईल. नेताजींच्या आझाद हिंद फौजींनी कोहिमावर हल्ला केला त्यांना काही ठिकाणी जय मिळत होते तर काही ठिकाणी पराजय सुद्धा चाखावा लागत होता.



अशा परिस्थितीत इंफाळवर आझाद हिंद फौजेने व जपानच्या सेनेचे आक्रमण केले ते आक्रमण विफल झाले. त्यावेळेस जपानी सरकारने नेताजींना तिथून सुरक्षित काढण्यासाठी सर्व प्रकारची योजना केली व नेताजींना तिथून निघून जाण्या ची विनंती केली. परंतु नेताजींनी आपल्या महिला सैनिकांसोबत शेकडो किलोमीटर पायी चालणे पसंत केले परंतु ते तिथून निघून गेले नाहीत. एक वेळ अशी आली की रंगून मध्ये ज्या ठिकाणी नेताजी बसलेले होते त्यांच्यापासून दहा किलोमीटर अंतरावर इंग्रजांच्या गाड्या पोहोचलेल्या होत्या. आकाश इंग्रजांच्या विमानांनी भरलेले होते. काही परिस्थितीत नेताजी आपल्या सैनिकांसोबत युद्धाच्या मोर्चावर सज्ज होते. नेताजीं मुळे भारतीय तरुणांना सैनिकीकरणाची प्रेरणा मिळाली. आमची पण फौज असू शकते. आम्ही पण विजयी होऊ शकतो हा विश्वास भारतीय तरुणांना नेताजींमुळे मिळाला. एक सुसंघटित, शिस्तबद्ध, प्रशिक्षित सैन्य कसे असू शकते याचे उदाहरण नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी घालून दिलेले आहे. नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेपासूनच प्रेरणा भारतातील नौसैनिकांनी घेतली व पुढे त्यांनी सुद्धा सत्याग्रह केला. ज्यावेळेस अंदाजे चाळीस हजार सैनिकांनी सत्याग्रह केला त्यांनी आपले शस्त्र इंग्रज सरकारला वापस केले व आम्ही आमच्याच भारतीय लोकांविरुद्ध लढणार नाही अशा पद्धतीची घोषणा केली त्यावेळेस मात्र इंग्रज सरकार हदरले व त्यांच्या हे लक्षात आले की या फौजेच्या आधारावर आता भारता वर राज्य करणे शक्य नाही. आणि त्यामुळे हळूहळू भारताच्या स्वातंत्र्याची बीजे अंकुरित व्हायला लागली व शेवटी 1947 सालीआमचा देश स्वतंत्र झाला. नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी भारताच्या स्वातंत्र्य करता भारताच्या बाहेर राहून जो लढा उभारला, जे सैन्य जमवले, देश विदेशातील मोठमोठ्या लोकांच्या ज्या भेटी घेतल्या त्या सगळ्या त्यांच्या देशभक्तीच्या परिचय देणाऱ्याच आहेत. नोव्हेंबर 1940 मध्ये नेताजींना कोलकाता येथील त्यांच्या घरी स्थानबद्ध करण्यात आले. त्यावेळेस त्यांच्या घराच्या बाहेर पहारा बसविण्यात आला होता. अशा परिस्थितीत नेताजी त्या घरातून रहस्यमयरीत्या बाहेर पडले. घराच्या बाहेर त्यांचा पुतण्या शिशिर बोस कार घेऊन त्यांची वाट पाहत होता. तेथून नेताजी गोमोह नावाच्या रेल्वेस्टेशनवर गेले. तिथून ते पेशावरला गेले. पेशावरला गेल्यानंतर भगतराम तलवार यांच्यासोबत नेताजी पायदळ अफगाणिस्तानची राजधानी काबुल कडे निघाले .वाटेमध्ये त्यांनी मौलाना जियाउद्दीन असे नाव धारण केलेले होते. अनेक अडचणींचा सामना करत इंग्रजांचा व स्थानिक कबायली लोकांचा ससेमीरा चुकवित नेताजी काबुलला पोहोचले. तेथे ते उत्तमचंद्र नावाच्या व्यक्तीच्या घरी थांबले. तेथे त्यांनी इटलीच्या राजदुतांची भेट घेतली व त्यांच्या मदतीने तेथून ते जर्मनीची राजधानी बर्लिनला पोहोचले. तिथे जाऊन त्यांनी हिटलरची भेट घेतली व भारतीय स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले. परंतु हिटलर कडून आपल्याला फारशी मदत होणार नाही हे लक्षात आल्यावर पाणबुडीने समुद्रातला प्रवास करीत ते जपानला पोहोचले. ही पाणबुडी दिवसभर समुद्राच्या तळाशी राहायची व रात्र होताच प्रवास करायला लागायची. अतिशय छोट्या जागेत अनेक दिवस प्रवास करीत नेताजी जपानला पोहोचले व त्यानंतरच आझाद हिंद फौजेची स्थापना झाली. नेताजींचे संपूर्ण जीवन व त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी केलेले कठोर परिश्रम हे आमच्या भारतीयांसाठी प्रेरणास्पद आहेत. 30 डिसेंबर 1943 रोजी अंदमान निकोबार बेटांवर फडकविलेला तिरंगा हा आमच्या सैन्याचा एक मोठा विजय दिवस आहे. दे दी हमे आजादी बिना खड्ग बिना ढाल असे म्हणणाऱ्या लोकांनी आझाद हिंद फौजेचा इतिहास एकदा वाचावा असे वाटते. भारतीयांनी आझाद हिंद फौजेचे, त्यांच्या सैनिकांचे व देश गौरव नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे.

# वाढदिवसाचा खर्च सत्करणी लागावा!

आधुनिक केसरी

वाढदिवस हा माणसाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा दिवस आहे.सर्वत्र वाढदिवस साजरे केले जातात. गरीब, श्रीमंत सर्वच जण वाढदिवस साजरे करत असतात. वाढदिवस साजरा करत असताना आपण हे विसरत चाललो आहोत कि आपलं आयुष्य एक एक वर्षानी कमी होत आहे. वाढदिवस साजरे करणं हे क्षणिक सुखासारखे आहे. वाढदिवस साजरे करायलाच हवे यात दुमत नाही.

परंतु आज वाढदिवसाचे स्वरुप बदलत चालले आहे. कुठेही चौका चौकात एखाद्या गाडीवर केक कापायचा व फटाके फोडायचे नंतर तोंडाला केक लावायचा एक प्रकारे केकची नासधुस होत असते. असं चित्र कुठेना कुठे दिसत असते.एक प्रकारे पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण होत असल्याचं चित्र दिसत आहे. आज वाढदिवसाच्या नावाखाली वारेमाप खर्च होत असतो. तोच खर्च टाळून जर आपण समाजहितासाठी वापरू शकतो. वृक्षारोपण, वृद्धाश्रमाला मदत, अनाथाश्रमला मदत, गोरगरीबांना अन्नदान ,एखाद्या ग्रंथालयाला पुस्तके भेट देऊन, शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या पुस्तके, सायकल भेट देऊन हॉस्पिटलमधील रूग्णांना फळे वाटप, अशा प्रकारे आपण नक्कीच मदत करू शकतो. खरोखर आज याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. वाढदिवसाचा खर्च सत्करणी लागला पाहिजे. पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण न करता वाढदिवसाचा होणारा खर्च समाजहितासाठी वापरायला हवा. प्रत्येकाने आपल्या वाढदिवसानिमित्त एक तरी झाड लावले पाहिजे. यामुळे पर्यावरणाचे रक्षण मात्र नक्की होईल व वाढदिवसाचा खर्च देखिल सत्कारणी

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845



# भारतातून अप्रत्यक्षरित्या होतेय पाण्याची निर्यात



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**पाणी म्हणजे जीवन! या मूलभूत स्रोताची आपल्या देशात विलक्षण टंचाई आहे. जागतिक लोकसंख्येच्या 18 टक्के लोक भारतात राहतात आणि निसर्गाने आपल्याला उपलब्ध करून दिलेला पाण्याचा साठा केवळ चार टक्के आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि त्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करणे आवश्यक आहे. काटकसर करायची, तर खर्च कुठे होतो ते प्रथम समजून घेतले पाहिजे. सरकारच्या आयात - निर्यात धोरणाच्या धरसोड वृत्तीमुळे आपल्याला डाळी आणि तेलबिया मोठ्या प्रमाणात आयात कराव्या लागतात. त्यांच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर परदेशी भांडवलही खर्च केले जाते.**


इंधन आयातीपाठोपाठ खाद्यतेल आणि डाळींच्या आयातीवर आपले परकीय भांडवल खर्च होत आहे. इतकेच नव्हे तर गहू, धान या पिकांच्या उत्पादनासाठी पाणी व्यवस्थापन आणि वीज व्यवस्थेत खर्च होणारा पैसाही अप्रत्यक्ष निर्यात होतो आणि त्याचा तोटा आपल्यालाच भोगावा लागतो. पण राजकारणाच्या दृष्टीकोनातून हे वास्तव उघड होत नाही किंवा विरोधक हे मुद्दे संसदेत मांडत नाहीत. पाण्याची अप्रत्यक्ष निर्यात हा शेती आणि कृषी-औद्योगिक उत्पादनांशी निगडित प्रश्न असून, त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची निर्यात होत आहे. या पाण्याला 'वर्चुअल वाटर' असेही म्हणता येईल. वास्तविक भारतातून तांदूळ, साखर, कपडे, पादत्राणे, फळे आणि भाजीपाला मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो. ते तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी खर्च केले जाते. आता तर ज्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी येथे बाटलीबंद पाण्याचे प्लांट उभारले आहेत तेही हे पाणी अरब देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात करत आहेत. अशा प्रकारे निर्यात होत असलेल्या पाण्यावर वेळीच नियंत्रण न ठेवल्यास आपल्यापुढील जलसंकट आणखी वाढणार आहे. देशातील तीन चतुर्थांश रोजगार पाण्यावर अवलंबून आहेत. हे सामान्यतः विसरले जाते की शुद्ध पाणी तेल आणि लोखंडासारख्या खनिजांपेक्षा कितीतरी जास्त मौल्यवान आहे, कारण पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रति हेक्टर वीस हजार डॉलर्स दराने पाणी जागतिक अर्थव्यवस्थेत सर्वात जास्त योगदान देते. या दृष्टिकोनातून, भारतातून कृषी आणि कृषी उत्पादनांद्वारे पाण्याची अप्रत्यक्ष निर्यात हे आपल्या पृष्ठभागाच्या आणि भूगर्भातील पाण्याच्या साठ्याच्या शोषणाचे प्रमुख कारण बनत आहे. खरे तर एक टन धान्य उत्पादनासाठी एक हजार टन पाणी लागते. तांदूळ, गहू, कापूस



आणि ऊस यांसारख्या पिकांना सर्वाधिक पाणी वापरतात. आम्ही यापैकी बहुतेक निर्यात करतो. सर्वाधिक पाणी भात पिकवण्यासाठी वापरले जाते. पंजाबमध्ये एक किलो धानाचे उत्पादन करण्यासाठी 5,389 लिटर पाणी लागते, तर पश्चिम बंगालमध्ये तितकेच भात उत्पादन करण्यासाठी सुमारे 2,713 लिटर पाणी खर्च होते. पाण्याच्या वापरातील हा मोठा फरक म्हणजे पूर्व भारतापेक्षा उत्तर भारतात तापमान जास्त आहे. शेतातील माती आणि स्थानिक हवामान हे देखील पाण्याच्या वापराशी संबंधित महत्त्वाचे घटक आहेत. तसेच साखरेसाठी उसाचे उत्पादन करताना पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो.

गव्हाच्या चांगल्या पिकासाठीही तीन ते चार वेळा सिंचन करावे लागते. जास्तीत जास्त सत्तर टक्के पाणी सिंचनासाठी वापरले जाते. बावीस टक्के पाणी उद्योगांमध्ये आणि आठ टक्के पाणी पिण्यासाठी व इतर घरगुती कारणांसाठी वापरले जाते. परंतु नद्या आणि तलावांची पाणी साठवण क्षमता सतत कमी होत आहे आणि सिंचन आणि उद्योगांसाठी होणाऱ्या शोषणामुळे, पृष्ठभागाच्या वर आणि खाली पाण्याचे प्रमाण सतत कमी होत आहे. अशा परिस्थितीत पिकांच्या स्वरूपात पाण्याची अदृश्य निर्यात समस्या अधिकच बिकट करत आहे. याला आळा घालण्यासाठी पीक पद्धतीत सर्वंकष बदल करण्याची आणि सिंचनात आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्याची गरज आहे. मुख्यतः शेतीला लागणाऱ्या पाण्यात काटकसर व्हायला हवी प्रत्यक्षात शेती क्षेत्राकडून होणाऱ्या पाण्याच्या मागणीत सातत्याने वाढच होत आहे. उदाहरणार्थ पंजाब व हरियाणा या राज्यांमध्ये हरितक्रांतीनंतर खरीप हंगामात भात आणि रब्बी हंगामात गहू ही पिके घेतली जातात. 50 वर्षांपूर्वी या राज्यांतील शेतकरी प्रामुख्याने ज्वारीचे पीक घेत असत. भाताच्या पिकासाठी ज्वारीच्या सहापट पाणी लागते; आणि गव्हाच्या पिकासाठी ज्वारीच्या दुप्पट पाणी लागते. हा उत्पादित गहू, तांदूळ आपण निर्यातही करतो. म्हणजे एका अर्थाने ही पाण्याचीच निर्यात आहे! पाण्याची टंचाई असणाऱ्या देशाने अशी पाण्याची निर्यात करणे, हे कितपत योग्य आहे? महाराष्ट्रातही उसासाठीच्या पाण्याच्या मागणीत वाढ होत गेली आहे. महाराष्ट्रात 1960 नंतर उसाखालचे क्षेत्र झपाट्याने वाढत गेले आहे. 1960 मध्ये महाराष्ट्रात उसाखालचे क्षेत्र 1.5 लाख हेक्टर होते. आता ते 12 लाख हेक्टर झाले आहे. महाराष्ट्रात एक हेक्टर क्षेत्रावर उसाचे पीक घेण्यासाठी पाटाने पाणी दिल्यास 48 हजार घनमीटर पाणी लागते. पाण्याच्या अशा राक्षसी गरजेमुळे धरणे आणि बंधाऱ्यांतील बरेचसे पाणी उसाच्या शेतीसाठी खर्च होते. परिणामी इतर पिकांसाठी साधी संरक्षक सिंचनाची सुविधाही उपलब्ध होऊ शकत नाही. असे मौल्यवान पाणी वापरून तयार होणारी साखरदेखील आपण निर्यात करतो. अशा निर्यातीसाठी सरकार अनुदानसुद्धा देते, म्हणजे येथेही पाण्याची निर्यात! कोणत्या पिकांना प्राधान्य द्यायचे हे त्या पिकांसाठी लागणाऱ्या पाण्याचे मोजमाप करून ठरवले पाहिजे. शास्त्रशुद्ध दृष्टिकोन ठेवून कमी पाणी 'पिणारी' पिके प्राधान्याने लावल्याशिवाय पाण्याची टंचाई दूर होणार नाही.

# स्त्रियांवरील अत्याचार... एक दाहक सत्य..



सुजाता नवनाथ पुरी
संपर्क 8421426337

आधुनिक केसरी

**तीन जानेवारी सावित्री बाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून सर्वत्र साजरी होत असते.परवाच गेवराई तालुक्यातील पंचाहत्तर वर्षीय वृध्द महीलेवर झालेली अत्याचाराची बातमी अजुन ताजी आहे तो वर निरागस बालिकांवर अत्याचाराच्या बातम्या ही कानावर येत आहेत,म्हणूनच प्रश्न पडतो की बालिका दिन की दीन बालिका. आपला प्रवास हा झपाट्याने पुरोगामी कडून प्रतिगामी कडे होतोय की काय असं वाटायला लागले आहे. भोजे शू माता, सेवे शू दासी, शयने शु रंभा, कार्येषु मंत्री... वरील ओळीत स्त्रियांचे महात्म्य पुराणकाळापासून वर्णिलेले आहे..... कोणे एकेकाळी तर मातृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात होती म्हणतात...**



मग आजच्या या आधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या काळात स्त्रियांची अशी दयनीय अवस्था का झाली असावी,रोजच स्त्री अत्याचाराच्या बातम्यांनी सगळा देश हादरत असतो..

देशातील वेगवेगळ्या भागातून स्त्रियांवरील अत्याचारांची उदाहरणे कानावर येत आहेत... स्त्री ला देवी म्हणून पूजणाऱ्या देशात हे वर्तन कितपत योग्य आहे... याला जबाबदार कोण... समाज, राजकारणी, संदेश व्यवस्था की अजून काही... स्वातंत्र्यानंतरच्या इतक्या वर्षानंतरही जर अशी भयानक अवस्था असेल तर स्त्री जातीच्या अस्तित्वाची लवकरच कहाणी संपेल आणि पर्यायाने मानवी जीवनही... कारण स्त्री ही ही जीवनदायिनी आहे.....

स्वातंत्र्याच्या या काळातही
प्रवास कसला,, फरपट अवगी,,, पान जला तून वाही रे... अजून उजाडत नाही रे*..

अशीच काहीशी अवस्था स्त्री यांची झालेली आहे..
झाडावरचा पान जेव्हा पाण्यात पडतं तेव्हा तो त्याचा प्रवास नसतो तर ती असते फरपट... स्त्रियाही जन्म घेतात पण त्यांचे जीवन त्यांना त्यांच्या पद्धतीने खरंच जगता येते का?

त्यांची ही ती फरफटत असते.. आज स्त्री या कोणत्या क्षेत्रात मागे नाहीत परंतु त्यांच्यावर रोज होणारे अत्याचार पाहिले तर असे म्हणावे लागेल की त्या नीच पना मध्ये नक्कीच स्पर्धेत नाहीत... यासाठी गरज आहे ती स्त्री संघटनाची... हे काम फक्त शिक्षणच करू शकते..

बेटी बचाव ही आता घोषणा आहे कि चेतावणी अशी शंका निर्माण व्हायला लागली आहे.. शिक्षणाने माणूस जर सुसंस्कृत होत नसेल तर अशा शिक्षणाचा उपयोग काय, ? असा प्रश्न हताशपणे विचारावासा वाटतो..

प्रत्येक कळीला हक्क आहे जगण्याचा
माती मधला वतन वारसा आभाळा वरती कोरण्याचा..
मग अशा कळ्या गर्भातच का खुडल्या जातात.. का नाकारला जातो हक्क त्यांना जगण्याचा...

यावर आता विचार होणे गरजेचे आहे... मुलींचे संगोपन सुद्धा मुलांसारखेच करणे गरजेचे आहे..
तिच्यातील आत्मविश्वास हीच तिची ताकद आहे हे तिला पटवून देणे गरजेचे आहे... स्त्रीया या पुरुषांपेक्षा अधिक खंबीर असतात,, अनेक समस्या त्या पुरुषांपेक्षा जास्त चांगल्या प्रकारे सोडू शकतात त्याचे कारण आहे त्यांची सहनशीलता,,, पण हिच सहनशीलता जर त्यांच्या जगण्याच्या आड येत असेल तर....? आज महिलांवर होणारे वेगवेगळे अन्याय हेच दर्शवितात की यामध्ये आता स्त्रियांच्या संघटनाची गरज आहे.. दे बस दिशा का इशारा
मंजिल हम खुद खोज लेंगे
करादे अपनी मदत का नजारा
सहारा हम खुद खोज लेंगे
अशी आर्त हाक एक स्त्री समाजाला मारत आहे... या जीवनदायी ची आर्त हाक आपण ऐकणार नाही का...


ती अशी उंचावता... नभही जरासे वाकले
पसरता ज्योती तिची, चंद्र, सूर्यही झाकले...
कवळीले ब्रम्हांड
आता मागू नका हो दाखले...

आपले अस्तित्व टिकवण्याची आणि आपला सन्मान जपण्याची महत्त्वाची जबाबदारी स्त्री वर येऊन पडलेली आहे... त्यासाठी शिक्षण,, संघटन,, आणि संघर्ष ही त्रिसूत्री वापरावी लागेल...
शेवटी फक्त एवढेच म्हणावेसे वाटते की...
हे स्त्री तू विश्वमोहिनी, घराची स्वामिनी, मुक्त विचारांची सौदामिनी, तरीही वंदिनी...
शुभचिंतक कल्याणी, नी स्वार्थ प्रेम करणारी अनुरागिनी,,
दृष्ट प्रवृत्ती नाशक रणरागिनी,,
तू या विश्वात आहेस वंदीनी.. आहेस वंदिनी

# गुरु भक्ती

आधुनिक केसरी

एक सुंदर असे गाव होते, पारिसर एकदम सुस्वच्छा होता- रंग रंगोटीने रंगलेले सुंदर घरे, रस्त्याच्या दोन्ही कडेला शोभवंती फुल झाडे गावच्या एकांत पारिसरात भव्य दिव्य



शाळेची इमारत. गावच्या वेशिसमोर एक हेमांडपंथी मंदीर आणि त्या मंदीराच्या आवरणात भक्तीमय वातावरण. एका थोर कीर्तन काराचे प्रवचन चालू होते, गावातील जन बाबाचे भक्त शिष्य पण आले होते. परमपरागत प्रमाणे दरवर्षी ह्याही वर्षी बाबाचे किर्तन होते. दरवेळेला नवनवीन बाबाचे शिष्य बनायचे. बाबाचे किर्तन चालू झाले आजुबाजुच्या पंचक्रोशीतून बाबांचे कीर्तन ऐकण्यास लोक जमा होऊन भक्तीचा स्वाद घेऊ लागले. मंडपाच्या एका कोपऱ्याला व्यसनाधिन असलेला दारू पिलेला मळकट कपडे पारिधान केलेला संपत नावाचा व्यक्ति बाबाचे किर्तन ऐकण्यासाठी मंडपाच्या एका बाजुला पाय लाबुन खांबाला पाट टेकुन तो किर्तन ऐकू लागला. संत ज्ञानाच्या महिमेंत तो रंगू लागला. सात दिवसाच्या सप्ताह मधी एक एक दिवस संपु लागले, आणि शेवटचा दिवस उजडला महा सोहळ्याचं आयोजन चालु झाले. कीर्तनाचा स्वाद चाखू लागले महाप्रसादाचा कार्यक्रम चालू झाला, बरेच जन बाबाच्या चरणावर आपलं मस्तक ठेऊन आशिर्वाद घेऊ लागले बाबा बऱ्याच जनाला गुरू मंत्र देऊ लागले , संपतला पण वाटले आपण सुद्धा बाबांकडून गुरु मंत्र घेतला पाहीजे, आपण गुरू केला पाहीजे म्हणुन तो उठला,आणी बाबाजवळ जाण्यास निघाला. पण त्या संपतला बाबाजवळ काही शिष्य जाऊं देईना. म्हणून त्यांनी आरडा ओरडा केला, मला पण गुरू मंत्र दया, मला पण गुरू करायचा आहे. त्यातले काहीजन बाबाला म्हणाले बाबा त्याचं ऐकू नका तो दारूडया आहे तुम्ही त्याला कान मंत्र देऊ नका, त्याच्याकडून ते पाळल्या जाणार नाही, विटबंना होईल काहीनी बाबाला सांगीतंले. तुम्ही त्याला खोटा कान मंत्र दया त्या वक्तीकडून कुठलीच विटबंना होणार नाही. म्हणून बाबाला पण वाटले आपण ही त्यास खोटा दिला पाहीजे, आणि खोटा मंत्र बाबांनी संपतला दिला. संपत पण त्या मंत्राचा जप करू लागला, उठता बसता खाता पिता मंत्राचा जप करू लागला, बाबाधर्म कार्यासाठी जगभर भ्रमणासाठी निघाले, या काळ बाराच निघुन गेला. बारा वर्षाचा काळ संपत आला, पावसाळ्याचे दिवस होते, बाबा पलीकडच्या गावात आले होते, बाबांना आलीकडच्या गावात येऊन किर्तन करायचे होते, पण दोन्ही गावच्या मधी खुप मोठी नदी दोन्ही थडया भरून वाहात होती. त्या गावातून ह्या गावात बाबाला किर्तनासाठी आनायचे पण त्या पाण्यातुन बाबाला आनण्यासाठी कोणी पुढे धसेना. एक जन म्हणाला कोणबर बाबाचा खरा शिष्य आहे तोच शिष्य बाबाला पाप्यातुन इथ पर्यत आणु शकतो. सगळे जन एकदुसऱ्या कडे पाहु लागले सर्व भक्तामधी जोरात चर्चा चालु झाली, आता बाबाला कोणबरे आणनार , संपतला वाटले आता आपली गुरू भक्तीची परिक्षा आहे, आपणच बाबाला आणायला पाहीजे. हातात काठी घेऊन संपत थेट वाहत्या पुरात उतरला ,बाबांनी दिलेला मुखी मंत्राचा जप ह्या काठापासुन त्या काठापर्यत संपत पोहचला अण् बाबाला म्हणाला , गुरूवर्य माझे दैवत , मी तुम्हाला घेऊन जाण्यासाठी आलों आहे, तुम्ही चला माझ्या सोबत संपतला पुर्ण विस्वास वाटत होते साक्षात गुरू सोबत आहे आता तर मला काहींच होणार नाही. बाबाला पाण्यात उतरायची भीती वाटत होती, नदी काठोकाठ भारून वाहात होती, बाबा म्हणाले थोडे पाणी वसरले की मग जाऊ, संपत काही ऐकेना बाबाचा हात धरला आणी थेट पाण्यात उतरला, बाबांनी दिलेल्या मंत्राचा जप करू लागला, मरामरा, मरामरा, म्हणत म्हणत संपत थेटं बाबाला घेऊन पोहचला, सगळे जन संपतची प्रशासा करू लागले बाबाला वाटले आपण संपतला खोटा मंत्र दिला पण त्या मंत्राच्या पोटी त्याची ती भक्ती होती त्या भक्तीच्या जोरावर तो बाबाचा खरा शिष्य ठरला.

**लेखक कवी गीतकार**
**जगन्नाथ जाधव येसगाव- 9673150705**

# प्रख्यात इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे मराठी इतिहास संशोधक होते. त्यांनी संपादित केलेले मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचे २२ खंड हे मराठा साम्राज्य इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वाचे साधन मानले जाते. सविस्तर माहिती श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींच्या लेखातून. सन १८९८ साली त्यांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. दि. ७ जुलै १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना त्यांच्या पुढाकाराने झाली. राजवाडे म्हणायचे- ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्य लोक शिकतील; माझ्या ग्रंथांची पूजा करतील. मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीर्तीला हपापलेला नाही. वि.का.राजवाडे यांचा जन्म महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील वरसई येथे दि.२४ जून १८६३ रोजी झाला. बीएपर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर करून ते प्रकाशात आणण्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक सुरू केले. त्यांच्या जन्माच्या वर्षाबाबत थोडा गोंधळ झालेला दिसतो. त्यांच्याविषयीच्या विविध लेखनांत त्यांचे जन्मवर्ष वेगवेगळे दिलेले आढळते. राजवाडे यांच्या मृत्यूनंतर द.वा.पोतदार यांनी केसरीत लिहिलेल्या लेखात त्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८६ अशी नोंदवलेली आढळते.**

यानुसार इ.स.१२ जुलै १८६४ हा दिनांक मिळतो. मात्र त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रकाशित झालेल्या ब्राह्मण-पत्रिकेच्या राजवाडे तिलांजली अंकात वा.दा.मुंडले यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे, त्यानुसार राजवाडे यांनी मुंडल्यांना आपला जन्मशक १७८५ असा सांगितला होता. त्याबाबत मुंडले यांनी पोतदारांकडे विचारणा केली आणि राजवाड्यांचे थोरले बंधू वैजनाथपंतांकडे विचारणा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे विचारणा केली असता राजवाडे यांची एक जन्मपत्रिका वैजनाथपंतांनी पोतदारांना उपलब्ध करून दिली. ती मुंडलेंच्या लेखात छापली असून त्यावर राजवाड्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८५ अशी नोंदवलेली आहे. इसवी सनानुसार हा दिनांक २४ जून १८६३ असा आहे. दत्तोपंत पोतदार यांनीही नंतरच्या काळात याच तिथीचा उल्लेख केलेला आढळतो. याव्यतिरिक्त दि.१२ जुलै १८६३ आणि दि.२४ जुलै १८६३ असे दोन दिनांक राजवाडे त्यांच्या जन्मतारखा म्हणून नोंदवलेल्या आढळतात. मात्र त्यांचे आधार नोंदवलेले आढळत नाहीत. त्यामुळे उपलब्ध पुरावे पाहता आषाढ शु.८ शके १७८५ अर्थात दि.२४ जून १८६३ हाच त्यांचा खरा जन्मदिनांक असावा, असे म्हणता येते.

राजवाडे यांच्या नावावर स्वतंत्र असा एकही ग्रंथ नाही. त्यांनी नियतकालिकांमधून किरकोळ स्वरूपाचे लेख लिहिले. महिकावतीची बखर आणि राधामाधव विलास चंपू या प्राचीन ग्रंथांचे संपादन केले. मुख्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती तब्बल बावीस खंडांमध्ये छापली. त्यांच्यापैकी काही खंडांना प्रस्तावना लिहिल्या. ते संपादनांपेक्षा अधिक गाजले ते या प्रस्तावनांमुळे. ज्यांना या प्रस्तावना आवडल्या नाहीत, त्यांनाही त्यांनी अविश्रांत कष्ट घेऊन ऋणी केले. प्रचंड भ्रमंती करून जमा केलेल्या इतिहासाच्या साधनसामग्रीसाठी त्यांच्या ऋणात राहण्यावाचून पर्यायच नव्हता. त्यांनी लिहिलेली राधामाधव विलास चंपू या प्राचीन



ग्रंथांचे संपादन त्यांनी केले. असेच त्यांच्या बहुतेक पुस्तकांबद्दल म्हणता येईल.

महाराष्ट्राच्या विचारविश्वात इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांचा मोठा दरारा, दबदबा आणि धाक होता. ते आपल्या हयातीतच एक आख्यायिका बनून गेले होते. त्यांच्यावर भरपूर टीका झाली. त्यांच्या हयातीतच प्रबोधनकार के.सी.ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, जिवाजी मंगेश तेलंग यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले होते. नंतरही इतिहास संशोधक त्र्यं.शं. शेजवलकर यांनी राजवाडेंच्या मर्यादा स्पष्ट केल्या. तथापि या सर्व गोष्टी एकत्र केल्या तरी त्यांचे वाक्‌य न्‌ वाक्य ब्रह्मवाक्‌य मानणारा एक वर्ग अस्तित्वात होता. विशेष म्हणजे मराठी विचारविश्वात याच वर्गाचे वर्चस्व असल्यामुळे त्यांचे स्थान अबाधित राहिले.

इतिहासकार राजवाडे हे बुद्धिमान तर होतेच; पण त्यांना प्रतिभाशक्तीचीही देणगी लाभली होती. जबरदस्त आत्मविश्वास हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यामुळे साधा अंदाज किंवा कयाससुद्धा ते अशा पद्धतीने व अशा आक्रमकपणाने मांडत, की जणू काही तो त्रिकालाबाधित सत्य असलेला महासिद्धान्तच आहे. मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यायचे म्हटले म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखवला पाहिजे. काल, स्थल व व्यक्ती या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग वा ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देता येते. अंतिम चित्रण, इतिहासलेखन, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती, व्याकरण अशा अनेक विषयांवर मूलभूत संशोधन करणारे आणि मराठी भाषेतून लेखन करणारे इतिहासकार म्हणून राजवाडे परिचित आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची साधने असे शीर्षक असणारे २२ खंड त्यांनी संपादित केले. त्यांच्या मते इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय. केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती नव्हेत, असे त्यांचे मत होते. अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. अशा या थोर इतिहासाचार्यांचे दि.३१ डिसेंबर १९२६ रोजी निधन झाले.

# 2022 - राजकीय सिंहावलोकन



सागर ननावरे
पुणे

आधुनिक केसरी

**पाहता पाहता २०२२ हे एक उत्तम वर्ष सरले. प्रत्येक क्षेत्राला या वर्षाने खूप काही दिले आणि बरेचसे हिसकावूनही घेतले. वेळेचा महिमाच असा आहे. किती भरले आणि किती उरले याचा हिशेब आता आपल्याला करावा लागणार आहे. २०२०-२१ कोरोनाच्या विळख्यातून गेले असताना २०२२ मात्र राजकीय उलथापालथींसाठी गाजले. महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक भूकंप या वर्षाने घडवून आणले. कुणी अपेक्षेपेक्षा चांगले मिळवले तर कुणी अनपेक्षित धक्क्याने गमावले. हे सारेच राजकीय पटाला धक्के देणारेच होते. अनेक भविष्यकारांची भविष्यवाणी सपशेल चुकीची ठरविणारे हे वर्ष ठरले.**

खरे तर वर्षाची सुरुवातच महाविकास आघाडी आणि विरोधी पक्ष यांच्यातील कुरबुरीने झाली. अनेक वर्षांची भाजपशी असणारी युती तोडून शिवसेनेने काँग्रेस- राष्ट्रवादी बरोबर केलेली महा विकासआघाडी भाजपला त्रासदायक ठरत होती. एकमेकांवर टोकाच्या टीका-टिप्पणीतुन मनास बोचणारी सल दिसून येत होती. देशाच्या सत्ताधारी पक्षासही यात जातीने लक्ष घालावे लागत होते. आणि यामुळेच या वर्षात राज्यातील राजकारणाने देशाच्या राजकारणालाही अक्षरशः ढवळून काढले होते. आम्ही पाच वर्षे यशस्वीपणे सत्तेत राहू अशी शास्वती देणाऱ्या महाविकास आघाडीला याच वर्षाच्या मध्यावर सुरंग लागला. आणि तिथून पुढे राजकारणात अक्षरशः खळबळ उडाली. यानंतरही बरेच काही घडले मात्र काळ कोणासाठी थांबत नसतो. राजकारणात तर सख्खेही थांबायला तयार नसतात, तिथे इतरांची काय कथा? त्यामुळे अनेक वाईट घटनांच्या पार्श्वभूमीवर देखील वर्षभरात राजकारण मात्र आपल्याच गतीने पुढे जात राहिले. यातीलच काही लक्षवेधी घटनांचा हा थोडक्यात घेतलेला आढावा.




**ईडीच्या दारी ते जेलवारी-*** गतवर्षात 'ईडी' ट्रेंडिंग मध्ये होती. राजकारणातील अनेक दिग्गजांना ईडीने अक्षरक्ष येड लावले. यात ईडीचा गैरवापर,सत्ताधाऱ्यांना अभय अशा अनेक अभ्यासाच्या बाजूही गाजल्या. मात्र १०० कोटींच्या मुद्द्याने चांगलाच जोर धरला. महाविकास आघाडीचं सरकार असताना राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना ईडीनं अटक केली. कथित 100 कोटींच्या वसुली प्रकरणात ईडीनं अनिल देशमुख यांना अटक केली. आणि त्यानंतर पुढे अनेक महिने त्यांना जेलमध्येच मुक्काम करावा लागला. दुसरे म्हणजे महाविकास आघाडीचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक हे मंत्री असतानाच जेलमध्ये गेले. नवाब मलिक यांना ईडीनं गोवावाला कंपाऊंडमधील जमीन खरेदीच्या व्यवहारात केलेल्या मनी लॉड्रिंग प्रकरणी अटक केली. त्यानंतर महाविकास आघाडीचे संकटमोचक शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांना पत्राचाळ घोटाळा प्रकरणात जेलमध्ये जावे लागले. त्यानंतर संजय राऊत यांना तब्बल 100 दिवसांनंतर जामीन मंजूर करण्यात आला.

**निवडणुका आणि चुरस*-** २०२२ मध्ये झालेल्या सर्वच निवडणुका चर्चेच्या ठरल्या. त्यात सुरुवातीला वर्षाच्या पहिल्या सत्रात महाविकास आघाडी विरुद्ध भाजप असा सामना रंगला होता. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या 10 जागांची अत्यंत चुरशीची निवडणूक झाली. यात भाजपला चार जागा मिळतील असा प्राथमिक अंदाज होता. मात्र भाजपचे पाचवे उमेदवार प्रसाद लाड या निवडणुकीमध्ये आश्चर्यकारक पद्धतीनं विजयी झाले आणि काँग्रेसच्या चंद्रकांत हंडोरे यांना पराभवाचा धक्का बसला. यात काँग्रेसची मतं फुटल्याचीही जोरदार चर्चा झाली. यानंतर झालेल्या राज्यसभेच्या 6 जागांसाठी झालेल्या निवडणुकीत शिवसेनेची हक्काची आणि हातातली एक जागा भाजपनं जिंकली. सहाव्या जागेसाठी धनंजय महाडिक आणि संजय पवार यांच्यात झालेल्या लढतीत महाडिकांनी बाजी मारली. आणि यानंतर बराच मोठा हायहोल्टेज ड्रामा घडला. या वर्षात राज्यात अनेक ठिकाणी ग्रामपंचायतीच्या (स्थानिक स्वराज्य संस्थेच्या) निवडणुकाही पार पडल्या. आणि सर्वच पक्षांनी आपल्या जागा कशा जास्त आल्या याचा कांगावा केला.

**गुवाहाटीतुन भूकंप हादरा महाराष्ट्रात*** - राज्यसभेच्या निकालानंतर शिवसेनेचे खंदे शिलेदारच नॉट रिचेबल झाले. शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी 40 आमदारांच्या साथीनं शिवसेनेतून फारकत घेतली. 40 आमदारांना सोबत घेत शिंदेंनी गुजरातमार्गे सुरत गुवाहाटी गाठले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्रात परत येत भाजपसोबत सत्ता स्थापन केली. आणि मी पुन्हा येईल हे शब्द सत्यात उतरून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार असा कयास बांधला जात असतानाच एकनाथ शिंदेच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडली. आणि शिंदे सरकार भाजपच्या मदतीने सक्रिय झाले. वर्चस्वासाठी संघर्ष* - एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर शिवसेनेचे दोन गट पडले . नेमकी शिवसेना कोणाची ? यावरून सुरु असणारी कोर्टाची तारीख पे तारीख आणि रखडलेले निर्णय याने आजही दोन्ही गटांना ताटकळत ठेवले आहे. यादरम्यान झालेली शक्तिप्रदर्शने,दसरा मेळावा वाद, यात्रा,सभा, टीकाटिप्पणी, संघर्ष , हक्कवाद याने राजकीय धुळवडीत चांगलीच रंगत आणली.

**वाचाळवीरांचे अकलेचे तारे -*** या वर्षात अजून एका विषयाने सर्वसामान्यांच्या तळपायाची आग मस्तकात पोहोचवली आणि ते म्हणजे नेत्याची बेभान आणि बेताल वक्तव्ये. एकमेकांविरुद्ध बोलताना मर्यादा न बाळगता केलेली टीकाटिपण्णी महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली. यातही अनेकांनी तर चक्क राजकीय व्यासपीठावरून महापुरुषांची बदनामी करून जनतेत तीव्र संतापाची लाट निर्माण केली. यात राज्यपालांपासून ते सत्ताधारी आणि विरोधक सर्वांनाच जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागले. एकूणच वर्षाच्या सुरुवातीपासूनच सुरु झालेली राजकीय चिखलफेक वर्षअखेरीसपर्यंत महापुरुषांच्या बदनामीपर्यंत कशी पोहोचली हे या वर्षी महाराष्ट्रातील तमाम जनतेने अनुभवले.

**काय डोंगर काय खोके अन काय वाक्ये*** - राजकारणातील घोषणा,विधाने किंवा काही वाक्ये ही कमालीची लोकप्रिय ठरत असतात. गेल्या वर्षीही अशीच काही वाक्ये कमालीची लोकप्रिय ठरली. मी पुन्हा येईल'च्या घोषणेला यश येण्यासाठीच्या प्रक्रियेत गुवाहाटीची घटना मैलाचा दगड ठरली. काय डोंगर,काय झाडी काय हाटील' या वाक्याने तर अक्षरशः धुमाकूळ घातला. यावर गाणेही रिलीज झाले. त्याचप्रमाणे 'पन्नास खोके एकदम ओके', या कथित आरोपाच्या ओळींनीही राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली. यासह अनेक वाक्ये सोशल मीडियावर चांगलीच लोकप्रिय ठरली.

२०२२ मध्ये वरील लक्ष्यवेधी घटनानांसह अनेक महत्वपूर्ण घडामोडी घडल्या. यात विविध वाद,निर्णय, आक्षेप आणि इतर अनेक राजकीय घडामोडी पाहायला मिळालया. परंतु महाराष्ट्राच्या राजकारणात २०२२ हे वर्ष निश्चितच एक महत्वपूर्ण वर्ष ठरले यात काहीही शंका नाही. अनेक अनपेक्षित घटना आणि राजकारणातले अस्सल डावपेच यानिमित्ताने पाहायला मिळाले. कुठे ख़ुशी तर कुठे गम पाहायला मिळाला. तर कुठे सत्य तर कुठे भ्रम पाहायला मिळाला. परंतु वर्ष जरी संपले तरी राजकारणाचा हा अध्याय संपलेला नाही. २०२३ अजून काय काय घेऊन येणार आहे हे पाहणे नक्कीच रोचक ठरणार आहे. २०२३ वर्षात राजकारणात काहीही घडो परंतु राजकीय संस्कृतीला आणि जनतेच्या हिताला कुठेही धक्का लागायला नको एवढीच नागरिक म्हणून भाबडी आशा. बाकी येणाऱ्या नववर्षाच्या नव्या राजकीय धूळवडीसाठी मनपूर्वक शुभेच्छा.

# नविन वर्षात शिक्षण, आरोग्य, उद्योगधंदे या क्षेत्रामध्ये गतीने काम करणे गरजेचे

आधुनिक केसरी

आत्मनिर्भर भारत होण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने स्वतः सकारात्मक प्रयत्न करणे हे देशाच्या प्रगतीमधील राजमार्ग असला तरी देशांतील जनतेच्या सुख - सुविधा निर्माण करण्याचे काम सरकारची यंत्रणा करत असते शिक्षण,आरोग्य,उद्योगधंदे, व्यवसाय वृद्धिंगत करणे हे आजच्या घडीला गरजेचेचं आहे त्यासाठी अजुनही सरकारने या क्षेत्रामध्ये गतीने काम केले पाहिजे खेड्यातील ग्रामीण भागामध्ये दळणवळणाची साधने उपलब्ध करुन त्या ठिकाणी रोजगार निर्मिती करणे खुप महत्वाचे काम आहे सद्या देशांमध्ये कोरोना सारख्या महाभयंकर आजारांनी जनता त्रस्त होत आहे त्यासाठी सर्व सोयींनीयुक्त तालुक्याच्या अथवा एका जिल्हा पंचायतीच्या मतक्षेत्रामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी करणे अपेक्षित आहे तसेच पुणे बेंगळूरु राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 च्या समांतर कराड व्हाया निपाणी, संकेश्वर,बेळगांव धारवाड हा बहुचर्चित रेल्वेमार्ग सुरु करणे गरजेचे बनले आहे या मार्गाचे सर्वेक्षण पुर्ण झाले असून सन 2011 च्या. रेल्वे अर्थसंकल्पात रेल्वे मंत्रालयाकडून या खात्याच्या तत्कालीन मंत्री ममता बॅनर्जी यांनी ग्रीन सिग्नल दिला आहे मात्र प्रत्यक्षात काम का सुरु होईना ? हे समजायला तयार नाही या मार्गावर अनेक साखर कारखाने,एमआयडीसी,शैक्षणिक संस्था यासह परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला फायदा मिळणार आहे शिवाय या रेल्वेलाईनमूळे लांबपल्यांच्या गाड्यांना 70 कि.मी.ने अंतर कमी होणार आहे यासारख्या रेल्वेमार्गाना सरकारने लक्ष देणे महत्वाचे आहे पायाभूत सुविधा निर्माण करताना दूरदृष्टी ठेवून प्रकल्प तयार करणे हे सरकारी यंत्रणेचं प्रामुख्याने क्रमप्राप्त ठरते मात्र तसे होताना दिसत नाही हीच खरी शोकांतिका म्हणावी लागेल !!

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# स्वागत करूया नववर्षाचे

आधुनिक केसरी

बघता बघता जुने वर्ष सरले
बघता बघता नवे वर्ष आले
गतवर्षाला निरोप देऊनी
स्वागत करूया नववर्षाचे...
नको दुःखाने ,करू आनंदाने
फटाके फोडीत ,
स्वागत करूया नववर्षाचे...
गतवर्षाची आठवण मनात ठेऊनी
नववर्षाचे संकल्प करूनी
दिवसामागून दिवस सरले
आठवडे महीने कसे गेले
ना कधी कुणाला कळले...
जुने सरूनी नवे वर्ष आले
नका करू ३१ डिसेंबर
दारु पिऊनी साजरा
तरुणांनो मनी जरा विचार करा
झाले गेले जुने विसरूनी जावे
नव्या दमाने ,नव्या जोशाने
स्वागत करूया नववर्षाचे
स्वागत करूया नववर्षाचे...

**कवी**
**संतोष दत्तू शिंदे**
**मु.पो.काष्टी,ता.श्रीगोंदा, जिल्हा,**



# जिल्हाधिकारी, स्थानिक नगरपालिका अतिक्रमणांबद्दल गप्प का ?

## राज्यसंरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे त्वरित हटवा : हिंदु जनजागृती समिती

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हिंदु विधिज्ञ परिषदेने 'राज्यसंरक्षित स्मारकां'च्या संदर्भात माहिती अधिकारात काही प्रश्न विचारले होते. त्याच्या उत्तरांमध्ये धक्कादायक माहिती उघड झाली आहे. यासंदर्भात पुरातत्व विभागाच्या सहाय्यक संचालकांकडून माहिती अधिकारात प्राप्त झालेल्या माहितीनुसार, संभाजीनगर येथील 33 राज्य संरक्षित स्मारकांवर अतिक्रमण झाले आहे, असे या विभागाने लेखी स्वरूपात उत्तर दिले आहे. याविषयी पुरातत्त्व विभागाने स्थानिक प्रशासन, पोलीस प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय यांनाही याविषयी कळवले असून वक्फ बोर्डासह सर्व अतिक्रमण करणार्यांना नोटीस बजावल्याचाही उल्लेख या उत्तरामध्ये केलेला आहे; मात्र जिल्हाधिकार्यांकडून अद्याप या अतिक्रमणाच्या संदर्भात कोणतीही कारवाई केलेली नाही. राज्यसंरक्षित स्मारकांवर अतिक्रमणे होईपर्यंत पुरातत्त्व विभाग झोपा काढत होता का आणि पुरातत्त्व विभागाने प्रशासनाला या अतिक्रमणाबद्दल कळवूनही जिल्हाधिकारी आणि स्थानिक नगरपालिकेचे अधिकारी काय करत होते, असा प्रश्न करत राज्यसंरक्षित स्मारकांवर झालेली अतिक्रमणे त्वरित हटवावीत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केली आहे. या अतिक्रमणांच्या संदर्भात हिंदु जनजागृती समिती आणि हिंदु विधिज्ञ परिषद यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी हिंदु विधिज्ञ परिषदेचे संस्थापक सदस्य पू. सुरेश कुलकर्णी, हिंदु जनजागृती समितीच्या संभाजीनगर समन्वयक कु. प्रियांका लोणे हेही उपस्थित होते.




या वेळी हिंदु विधिज्ञ परिषदेचे पू. सुरेश कुलकर्णी म्हणाले की, राज्य संरक्षित स्मारकांवर एवढ्या मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. याला पुरातत्त्व विभाग उत्तरदायी आहे. जर राज्यसंरक्षित स्मारकांवर कोणीही अतिक्रमण करत असेल, तर राज्यात शासन-प्रशासनाचे काही अधिकार शिल्लक आहेत कि नाहीत, असा प्रश्न निर्माण होतो. अतिक्रमणकर्ते इतके मुजोर झाले आहेत की, त्यांना शासन-प्रशासनाचा धाक राहिलेला नाही. या सर्व शासकीय विभागांची सद्यस्थिती म्हणजे 'आंधळा दळतो आणि कुत्रा पीठ खातो', अशी झाली आहे.

या पत्रकार परिषदेत हिंदु जनजागृती समिती आणि हिंदु विधिज्ञ परिषद यांनी पुढील मागण्याही केल्या.

1. राज्यसंरक्षित स्मारकांमध्ये अनधिकृत बांधकाम करणार्यां वर जिल्हाधिकार्यांषनी कठोर कारवाई करण्यात यावी.
2. राज्यसंरक्षित स्मारकांमध्ये केलेले अनधिकृत बांधकाम वा अतिक्रमण जिल्हाधिकार्यांनी त्वरित जमीनदोस्त करावे.
3. या अतिक्रमणांसाठी उत्तरदायी पुरातत्त्व खात्यातील अधिकारी वा अन्य संबंधित अधिकारी यांची चौकशी करून त्यांच्यावरही कारवाई करावी.
4. ज्या राज्य संरक्षित स्मारकांवर अतिक्रमण झाले आहे, ती स्मारके त्वरित पुरातत्त्व विभागाने ताब्यात घ्यावीत. या संदर्भात आम्ही मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार असून जर जिल्हाधिकार्यांनी या संदर्भात काही कारवाई केली नाही, तर आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशाराही घनवट यांनी या वेळी दिला.


# चंद्रकांत दळवी, डॉ. शहा यांना 'राष्ट्रीय बंधुता पुरस्कार'

## १२ जानेवारीला राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनात डॉ. सबनीस यांच्या हस्ते सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी आणि चिंचवड येथील प्रतिभा





ग्रुप ऑफ इन्स्टीट्यूटचे संस्थापक संचालक ज्येष्ठ व्यवस्थापनतज्ञ डॉ. दीपक शहा यांना यावर्षीचा 'राष्ट्रीय बंधुता पुरस्कार' जाहीर झाला आहे. सत्यशोधकी पगडी, प्रबोधनाची लेखणी, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या १२ जानेवारी रोजी होणाऱ्या २४ व्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली. नवी पेठ येथील एस. एम. जोशी सभागृहात राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद आणि औंध येथील रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय या संस्थाच्या वतीने २४ वे राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक शंकर आथरे यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी १० वाजता प्रसिद्ध साहित्यिक सायमन मार्टीन यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. दुपारच्या सत्रात महाराष्ट्रातील नामवंत कवी 'काव्यपंढरी' कवीसंमेलनात सहभागी होतील. यावेळी गुलाबराजा फुलमाळी (नेवासा) यांना लोककवी वामनदादा कर्डक, किशोर बुजाडे (खामगाव) यांना लोकगायक प्रल्हाद शिंदे आणि अमोल घाटविसावे (अहमदनगर) यांना पद्मश्री नामदेव ढसाळ काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. स्वागताध्यक्ष डॉ. विजय ताम्हाणे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, डॉ. अरुण आंधळे, ज्येष्ठ गझलकार सिराज शिकलगार, मधुश्री ओव्हाळ, डॉ. अशोककुमार पगारिया, प्रकाश जवळकर यांचा संमेलनात मुख्य सहभाग राहील. कोरोनासंबंधीचे सर्व नियम पाळून हे संमेलन होईल, असे मुख्य संयोजक प्रा. डॉ. प्रभंजन चव्हाण आणि प्रा. प्रशांत रोकडे यांनी सांगितले.

# देवदहिफळ येथे खंडोबा मंदिरात खाडे कुटुंबियाकडून आकर्षक व मनमोहक पुष्पसजावट; भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज



**परळी वैजनाथ :** येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष, खोबरे आणि भंडाऱ्याची उधळण करत भाविकांच्या उपस्थितीमध्ये देवदहिफळ येथे ग्रामदैवत खंडेरायाचे दर्शन घेण्यासाठी आज रविवार दि.1 जानेवारी रोजी श्री खंडोबा मंदिरात भाविकांची पहाटेपासूनच मोठी गर्दी झाली होती. श्री खंडोबा मंदिरात प्रदीप खाडे अध्यक्ष-कै.रामभाऊ अण्णा खाडे सेवाभावी संस्था लातूर, सहसचिव- नाथ शिक्षण संस्था परळी वैजनाथ व खाडे कुटुंबीयांच्या वतीने आकर्षक व मनमोहक अशी फुलाची मनमोहक पुष्पसजावट करण्यात आली आहे. चंपाषष्ठीपासून देवदहीफळ येथे खंडेरायाची यात्रोत्सव दीड महिना भरते. बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात देवदहिफळ येथे भाविक उपस्थित राहतात. येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष करत श्री खंडोबा मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण झाले आहे. नवीन वर्ष व यात्रोत्सव निमित्त दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. श्री खंडोबा मंदिर, देव दहिफळ येथे प्रदीप खाडे अध्यक्ष-कै. रामभाऊ अण्णा खाडे सेवाभावी संस्था लातूर, सहसचिव नाथ शिक्षण संस्था परळी वैजनाथ व खाडे कुटुंबीयांच्या वतीने नवीन वर्षानिमित्त व यात्राउत्सव निमित्त महाराष्ट्रातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या देवदहिफळ येथील ग्रामदैवत श्री मल्हारी म्हाळसाकांत खंडोबाच्या संपूर्ण श्री.खंडोबा मंदिर व गाभाऱ्यात मंदिर विविध रंगबेरंगी फुलांच्या सजावटीने बहरले असून अत्यंत आकर्षक सजावट व विविध आकर्षक फुलांची आरास मंदिर परिसर, गाभारा व सर्व ठिकाणी करण्यात आली आहे. खाडे कुटुंबियाच्या वतीने आज सकाळी श्री खंडोबा मंदिरात श्री खंडेरायाचे मनोभावे दर्शन घेऊन व विधिवत पूजन केले. मंदिर गाभारा व परिसरात झेंडूसह निशिगंधा, गुलाब, जरबेरा, शेवंती, अर्केट, लिलिअम, ब्लुडेझी यासह सुमारे विविध प्रकारातील फुलांचा वापर करून आकर्षक सजावट करण्यात आली आहे. मंदिरात आकर्षक फुलांनी व विद्युत रोषणाईने सजावट करण्यात आली असल्याचे प्रदीप खाडे यांनी सांगितले आहे.

# पर्यटन योजनेतून संत ज्ञानेश्वर उद्यानासाठी १० कोटी रुपयांचा निधी : पालकमंत्री संदीपान भुमरे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** ज्ञानेश्वर उद्यान विकासासाठी पर्यटन योजनेतून १० कोटी रुपये प्रशासकीय मान्यतेसह मंजूर झाले आहे यामुळे लवकर संत ज्ञानेश्वर उद्यानाचा पुनर्विकास होणार असल्याने उद्यान लवकरच पर्यटकांसाठी खुले होणार आहे , अशी माहिती पैठणचे आमदार तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी दिली . या दहा कोटी निधीतून मध्ये उद्यानातील वाहन व्यवस्था , मुलांसाठी बालोद्यान, सीसीटीव्ही कॅमेरे , तिकीट बुकिंग , कार्यालय इत्यादी व्यवस्था करण्यात येणार आहे . धरणाच्या पायथ्याशी असलेले संत ज्ञानेश्वर उद्यान हे जवळपास ६ वर्षापासून बंद आहे . पैठणला रोज नाथसागर तसेच मंदिरात दर्शनासाठी हजारो भाविक येतात . मात्र , संत ज्ञानेश्वर उद्यानात बंद असल्याने पर्यटकांचा हिरमोड होत आहे . आता मात्र उद्यान सुरु होणार असल्याने येथे येणाऱ्या भाविकांसह पर्यटकांना दिलासा मिळणार आहे .



उद्यानाचा विकास झाला पाहिजे पर्यटकाची संख्या वाढली पाहिजे यासाठी उद्यानाचा विकास होण्यासाठी उद्यान बचाव समितीने सतत पाठपुरावा केला . आता निधी उपलब्ध होणार असल्याने उद्यानाचा विकास होणार आहे , असे उद्यान बचाव समितीचे पवन लोहिया , संतोष गव्हाणे , संतोष गोबरे , बाळु आहेर , रमेश लिंबोरे यांनी मत व्यक्त केले.

> पैठणची बाजारपेठ पर्यटकावर अवलंबून आहे जर पैठणला पर्यटक आले तर त्याच्या खरेदीवर स्थानिक व्यावसायिक व्यवसाय करतात परंतु गेल्या कित्येक वर्षांपासून संत ज्ञानेश्वर उद्यान बंद असल्याने पर्यटकाची संख्या घटल्याने बाजरपेठेत त्याचा परिणाम दिसुन आला ,आता मात्र पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या मुळे उद्यान विकासासाठी १० कोटीचा निधी उपलब्ध होत असल्याने उद्यान सुरू झाल्यावर नक्कीच पैठणची बाजारपेठ खुलेल अशी आशा वाटते .
> **पवन लोहिया( अध्यक्ष) पैठण शहर व्यापारी महासंघ**

# कृषि प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे कृषी अधिकारी वाघ यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** सोयगाव व सिल्लोडचे मा.कृषि मंत्री अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून महाकृषी



मेळावा आयोजन करण्यात आले आहे. यामधे सखोल अशे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.सिल्लोड येथे दि १ ते ५ जानेवारी २०२३ रोजी भव्य कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे.हे महा कृषी प्रदर्शन'मराठवाड्यातील पहिले राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आहे.यामध्ये पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन,शेती विषयक अवजारे यावेळी विषयी सखोल मार्गदर्शन मिळणार आहे.प्रथमच राज्यातील चारही विद्यापीठाने कृषी विद्यापीठ व संशोधित केलेले उच्च महाबीज अकोला हे उत्पादनक्षम फळाच्या सहभाग घेणार आहेत. जाती, लागवड पद्धती, त्यामुळे विद्यापीठाचे विक्री व्यवस्थापन याची नवनवीन संशोधित वाण माहिती मिळणार आहे.

शेतात वापरले जाणारे आधुनिक शेतकऱ्याचे चर्चासत्र होणार आहे.यंत्रसामग्रीही येथे भरविले जातील व पाहायला मिळणार आहे. शेतकरी यांना शास्त्रज्ञ चर्चा विभागाच्या वतीने करण्यात येणार आहे.शेतकरी बंधू तिथे खरेदी घडवून आणतील. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निवारणाचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच इतर कंपन्यांकडून देखील भाग घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे त्यांना अचूक माहिती देण्यात येणार आहे. सोयगाव कृषी विभागाच्या तालुका कृषी अधिकारी एस.जी.जाधव यांच्या कडून असे आवाहन करण्यात येत आहे की शेतकऱ्यांनी जास्तीच जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून महा कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा. सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा दिनांक १ स जानेवारी ते ५ जानेवारी २०२३ मध्ये लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ यांनी केले आहे.



# मौजे वेरुळ ग्रामपंचायतचा कचरा निर्मूलनाचा अनोखा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** तालुक्यातील ग्रामपंचायत वेरुळ यांनी गांवातील, श्री घृष्णेश्वर मंदिर परीसर,जग प्रसिद्ध लेणी परीसर येथील कचरा संकलन बाबत सातत्याने कचरा गोळा करण्याचे काम सुरु असुन,हा कचरा तिर्थ कुंडपरीसरातील मोकळ्या जागेवर वर्षानुवर्षे टाकण्यात येत होता. सगळा कचरा हा ओला, सुका, प्लास्टीक असा एकत्र असलेला होता याचे मोठमोठाले डोंगर या जागेवर पसरलेले होते. त्यापासुन दुर्गंधीयुक्त असा वास यायचा. येणारा जाणाऱ्या व्यक्ती यांना याचा वास असाह्य व्हायचा. हा पडून असलेला कचरा ग्रामपंचायत कार्यालय व गावकरी यांची मोठी समस्या झालेली होती. या कचऱ्या पासुन गावाला मुक्ती मिळावी या करीता जिल्हा परिषद औरंगाबादचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विकास मिना, उपमुख्य कार्यकारी (अधिकारी स्वच्छता व पाणी पुरवठा) श्री.देसले साहेब यांच्या संकल्पनेतून व पंचायत समिती, खुलताबाद येथील गट विकास अधिकारी श्री. प्रविण सुरडकर, विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) श्री. एच. बी. कहाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास अधिकारी स्वप्नील घरमोडे यांनी जैवीक कल्चरचा वापर करुन हा अविघटीत कचरा या पासुन जैविक खत निर्मीती करण्याचा संकल्प केला. त्यानुसार दिनांक २६ डिसेंबरचा दिवस निश्चित करुन, या कामाची सुरुवात करण्यात आली त्यानुसार सातत्याने तीन दिवसात ४ बाय २४ फुट उंची ४.५ फुट या आकाराचे बेड २२ बेड या जागेवर तय्यार करण्यात आले असुन, साधारण १०० मे. टन कचरा यात संकलन करण्यात आले आहे. या पासुन तीस दिवसाच्या कालावधीत साधारण ५० ते ६० मे.टन खत निर्मिती होऊन कचरा याचे निर्मुलन होनार असुन, या पासुन गावातील शेतकरी यांना चांगल्या प्रतीचे जैविक खत हे गावातच मिळणार असल्यामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागातुन दळण वळण करणारे नागरीक यांना ही बाब नवीन असल्याने ग्रामपंचायत काय करीत असेल या पासुन कसे खत निर्मीती होऊ शकते हा कुतुहलाचा विषय बनला आहे. तसेच खताच्या विक्री पासुन ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातही भर पडणार आहे. घन कचरा यावर जैविक प्रक्रिया करण्यासाठी कोल्हापुर येथील घनकचरा मार्गदर्शक श्री. विद्याधर कुडतकर यांनी वेरुळ येथे जायमोक्यावर येवुन, स्थळ पाहणी करून तांत्रीक मार्गदर्शन केले . गट विकास अधिकारी प्रविण सुरडकर, विस्तार अधिकारी एच. बी.कहाटे, स्वच्छ भारत मिशनचे तालुका समन्वयक राजेंद्र दांडेकर, बीआरसी सुनिता मकरंद,सरपंच कुसुम प्रकाश पाटील, उपसरपंच विजय राठोड, माजी सरपंच प्रकाश पाटील, साहेबराव पांडव, जितेंद्र हजारी, हंसराज चव्हाण, सतीश लोखंडे, श्री गुलाबचंद बोराळकर, तलाठी देशमुख व तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी,सरपंच यांनी या कामास कामाच्या प्रात्यक्षिकास तीन दिवसात भेट दिल्या व सखोल,मोलाचे मार्गदर्शन केले. या कामाच्या यशस्वीते करीता ग्रा. पं. वेरूळ येथील ग्रामविकास अधिकारी स्वप्नील घरमोडे, ग्रा.पं.कर्मचारी राजेश आडे, मो नईमोद्दीन,शेख तौफिक, भय्याभाई, सुर्यभान भालेराव, गोरख लोनके, अविनाश आव्हाड यांनी अहोरात्र परीश्रम घेऊन कार्यक्रम नियोजन बद्ध पध्दतीने पार पाडला.



# नंदलाल काळे यांची राज्य सहकारी दुध महासंघ मुंबईच्या संचालकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** औरंगाबाद जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघाचे माजी अध्यक्ष तथा संचालक व पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे निकटवर्तीय नंदलाल पाटील काळे यांची महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ, मुंबई (महानंद )च्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल पैठण शहरात शहर व्यापारी महासंघाच्या वतीने तसेच बाळासाहेबची शिवसेना पदाधिकारी, तालुक्यातील दुध उत्पादक संस्थेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक नाथशेठ पोरवाल, पवन लोहिया, बळीराम लोळगे, भाऊसाहेब मापारी,वसंतराव भोसले, सुनील कुलकर्णी, सचिन लखोटीया, जगदीश लोहिया, आनंत लोहिया, कृष्णा मोरे ,प्रकाश पवार, अमित नागोरी, अमित सोमानी, उमेश तट्टु यांची उपस्थिती होती.

# ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयाचे विभागस्तरीय थाळीफेक स्पर्धेत यश


आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल स्कूल बाजार सावंगी येथील विद्यार्थी कु.रवींद्र बाळू काटकर या विद्यार्थ्याने विभागस्तरीय थाळीफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून त्याची राज्यस्तरीवर निवड झालेली आहे. ही स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल औरंगाबाद येथे पार पडल्या. या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाकडून अभिनंदन करण्यात आले असून व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. याप्रसंगी संस्था संस्थाध्यक्ष विजय दारकुंडे संस्था सचिव भाऊसाहेब काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजूर्के , ग्रामपंचायत सदस्य कल्याण काटकर, महाविद्यालयाचे राम राठोड, श्रीमती योगिता पारनेरे, मनोज राणे, नितीन पवार वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर ,योगेश सुरडकर सुरेखा जाधव, दीपक पाटील राहुल गायकवाड, भूषण जाधव अविनाश कोलते, अक्षय जाधव, ऋतुजा नलावडे, कु. श्रीमती खान, श्रीमती चोपडे शिपाई धुमाळ आदींना त्यांच्या शुभेच्छा दिल्या आहेत.


# प्रभाकर जगदाळे आकाशवाणीचे मान्यताप्राप्त संगीतकार

आधुनिक केसरी न्यूज



**उस्मानाबाद :** येथील इंन्डो वेस्टर्न म्युझिक कला अकादमीचे संचालक संगीतकार प्रभाकर जगदाळे हे आकाशवाणीच्या सेंट्रल ऑडिशन बोर्ड दिल्लीच्या वतीने घेण्यात आलेल्या हिंदुस्थानी लाईट अँड फोक म्युझिक ची ऑडिशन टेस्ट उत्तीर्ण झाले असून त्यांना म्युझिक कंपोझर विभागात 'बी' ग्रेड मिळाला आहे.

प्रभाकर जगदाळे हे मागील पंचेचाळीस वर्षांपासून संगीत क्षेत्राशी संबधीत असून ऑर्केस्ट्रा महाराष्ट्र म्युझिक क्लब, कुमार ऑर्केस्ट्रा, यादे पुराणी,ऑर्केस्ट्रा बॉर्न स्टार्स अशा विविध बॅनर च्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यातील कलावंतांना व्यासपीठ निर्माण करून देऊन संगीतक्षेत्रात भरीव असे काम केले आहे. सोबतच त्यांनी अनेक गीतकारांची गाणी संगीतबद्ध केली आहेत. त्या गीतांच्या तुळजापूरची जत्रा, माता तुळजाभवानी,
प्रीतीचा बंगला बांधीन मी चंद्रा, तुळजाभवानी अमृतवाणी, आईचा छबीना ई. सी.डी. व कॅसेट्स प्रसिद्ध झाल्या आहेत. सत्यसावित्री,ओटी जगदंबेची या दोन चित्रपटांनाही त्यांनी संगीत दिले असून श्रीकांत नारायण, अमेय दाते त्यागराज खाडीलकर, विवेक नाईक, शकुंतला जाधव, अंजली नांदगावकर, संचिता मोरजकर, जगदीश गोरसे, शशिकांत मुंबरे अशा नामवंत गायक, गायिकांनी ही गाणी गायिली आहेत. आकाशवाणीची म्युझिक कंपोझरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे जगदाळे आता आकाशवाणीचे ते मान्यताप्राप्त संगीतकार झाले आहेत. जगदाळे यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल संगीत आणि साहित्य क्षेत्रातील अनेक जाणकारांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# जिंदाल कंपनीत भीषण स्फोट; कर्मचारी गंभीर

## माहिती मिळताच पालकमंत्री दादा भुसे घटनास्थळी रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच नाशिकमध्ये भीषण घटना घडली आहे. नाशिकजवळ असलेल्या इगतपुरीतील मुंढेगावजवळ जिंदाल समूहाची कंपनी आहे. जिंदालच्या या कंपनीत आज सकाळच्या सुमारास मोठा स्फोट झाला. जिंदाल समूहाच्या पोलिफिल्मची निर्मिती करणाऱ्या या कंपनीत आधी स्फोट झाला आणि या स्फोटमुळे आग लागली. आगीमध्ये काही कामगार गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. काही कर्मचारी हे आत अडकल्याचंही सांगण्यात येत आहे. पोलिसह घटनास्थळी दाखल झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच पालकमंत्री दादा भुसे हे रवाना झाले आहेत.

इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव येथे जिंदाल कंपनीत मोठी आग लागली. जिंदालच्या अग्निशमन विभागासह महिंद्रा अँड महिंद्रा, घोटी टोलनाका येथील अग्निशमनच्या बंबांकडून आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नाशिक महापालिकेचे बंबही आग नियंत्रणात आणण्यासाठी मुंढेगावकडे रवाना झालेत. नाशिक ग्रामीण अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आहेत. आगीचे लोळ दूरवर दिसत होते.

दरम्यान, घटनास्थळावर बचाव कार्य सुरू असून परिसरात या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. तर परिसरात मोठा प्रमाणात घबराटीचे वातावरण निर्माण झालेले आहे. कंपनीत लागलेली भीषण असून कंपनीतीलच काम करणारे काही कामगार होरपळून जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. पण अद्यापही आगीचे कारण समजू शकलेले नाही. कंपनीला भीषण आग लागल्याने छोटे छोटे स्फोट होत असल्याची माहिती आहे. जिंदाल पोलिफिल्म कंपनीत जखमी घालेल्या नऊ जणांना शहरातील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. आणखी दोन कामगारांनाही खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी दिली. जिल्हा रुग्णालयाच्या सहा रुग्णवाहिका जिंदाल कंपनीकडे रवाना झाल्या आहेत.



# " द एम्फ " च्या शानदार उद्घाटनाला हेमा चौधरी, मुकेश त्यागी, अंकिता पटेल, आद्या सिंग, विनी राणा उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बॉलीवूडची मायानगरी आपल्या नाइट लाईफसाठी ओळखली जाते. लोखंडवाला अंधेरी पश्चिम मुंबईतील सर्वात खास आणि मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या " द एम्फ ' या अनोख्या नाईट क्लबचे उद्घाटन करण्यात आले. हेमा चौधरीच्या खास नाईट क्लबच्या भव्य उद्घाटनाला बॉलिवूडमधील अनेक सेलिब्रिटी पाहुण्यांची उपस्थिती दिसली.

पार्टी, नृत्य, संगीत आणि मजा यांनी भरलेली ती संध्याकाळ होती. येथे आलेल्या सर्व पाहुण्यांनी हेमा चौधरी यांना या नव्या सुरुवातीसाठी अनेक शुभेच्छा दिल्या, तर हेमा चौधरी यांनी येथे आलेल्या सर्व पाहुण्यांचे मनापासून आभार मानले.

द एम्फ मुंबईच्या लॉन्चिंगमध्ये चित्रपट जगतातील अनेक सेलिब्रिटींनी मौजमजेचा आणि नृत्याने भरलेल्या वातावरणाचा आनंद लुटला. सेलिब्रिटी पाहुण्यांमध्ये बिग बॉस फेम अर्शी खान, पायल घोष, अभिनेत्री अनुपम शुक्ला, अभिनेत्री विनी राणा आणि अभिनेत्री गेहना वशिष्ठ यांच्यासह अनेक प्रभावशाली आणि सोशल मीडिया स्टार्स देखील उपस्थित होते.

येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना हेमा चौधरी म्हणाल्या की, आमच्या नाईट क्लबच्या भव्य शुभारंभासाठी अनेक सेलिब्रिटी पाहुणे आले याचा आम्हा सर्वांना खूप आनंद आणि उत्साह आहे. येथे येण्यासाठी लोकांचा अमूल्य वेळ काढल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. द एम्फ चे नाव जितके वेगळे आणि वेगळे आहे तितकेच इथले खाणे, पिणे आणि मौजमजा करण्याचे वातावरणही तितकेच उर्जेने परिपूर्ण आहे.

अर्शी खान म्हणाली की, मला येथील वातावरण खूप सकारात्मक वाटले आणि



मला आशा आहे की नवीन वर्षाच्या निमित्ताने सुरू झालेल्या या नाईट क्लबची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत जाईल. गायक आणि अभिनेत्री अनुपम शुक्ला, जो नुकताच तिच्या म्युझिक व्हिडिओ तेज धारसाठी प्रसिद्धीझोतात आला होता, त्यांनी हेमा चौधरी यांना या नाईट क्लबसाठी शुभेच्छा दिल्या आणि सांगितले की अंधेरी पश्चिम लोखंडवालाच्या मुख्य स्थानावर असलेला हा नाईट क्लब पार्टीत जाणाऱ्यांसाठी एक गंतव्यस्थान आहे. छान भेट. इथे आल्यावर मला सकारात्मक आणि आनंदी वाटले. डान्स फ्लोअरवर पार्टी करण्याची इथली मजा आहे.

# राष्ट्रवादी जिल्हाध्यक्षावर जीवघेणा हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीच्या रागातून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाअध्यक्ष भाऊसाहेब तरमाळे यांच्यावर विरोधकांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना पैठण तालुक्यातील बोकूड जळगाव येथे घडली. या प्रकरणी सात आरोपींविरोधात बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अनिकेत अशोक नागे, राजु बनकर, आकाश अशोक नागे, दिनेश राठोड, अशोक रामनाथ नागे, सुनिल रुपचंद खरात, पांडुरंग भाकचंद नागे (सर्व रा. बोकुड जळगाव, पैठण) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदासाठी भाऊसाहेब यांच्या आई निवडणुकीच्या रिंगणात उभ्या होत्या. चांगल्या मताधिक्याने त्या निवडून आल्या. मात्र, हाच निवडणुकीचा राग विरोधकांच्या मनात होता. शनिवारी रात्री भाऊसाहेब हे गावात आले असता अनिकेत नागे याने त्यांच्यांशी वाद घातला व स्वतः जवळील धारदार चाकूने त्यांच्या मानेवर वार केला. घाव जोरात बसल्याने मोठा रक्तस्त्राव झाला. घटनेची माहिती प्राप्त होताच बिडकीन पोलीस ठाण्याच्या पथकाने गावात धाव घेतली.

# उद्यापासून गडचिरोलीत पोलीस भरती सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यात बहुप्रतिक्षित असलेल्या आणि तमाम सुशिक्षित बेरोजगारांचे लक्ष लागलेल्या पोलीस शिपाई व चालक पदाची भरती प्रक्रिया नवीन वर्षाच्या दुसऱ्याच्या दिवशी म्हणजे दोन जानेवारीपासून सुरू होत आहे. शारीरिक क्षमता चाचणीने या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. विशेष म्हणजे यावेळी पहिल्यांदाच त्यासाठी शंभर टक्के तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. भरती प्रक्रिया अचूक आणि पारदर्शीपणे व्हावी यासाठी हे तंत्रज्ञान वापरले जात असल्याचे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

राज्यातील संपूर्ण जिल्ह्यासाठी १४ हजार जागांची पोलीस भरती होत आहे. यात गडचिरोली पोलीस दलासाठी ३४८ पोलीस शिपाई आणि १६० चालक पोलीस शिपाई पदांची भरती प्रक्रिया होत आहे. यावर्षीच्या भरतीत बायोमेट्रिक पद्धतीने उमेदवारांची नोंदणी, इलेक्ट्रॉनिक आधारित उंची व छातीचे मोजमाप, आरएफआयडी आधारित १६०० मीटर व १०० मिटर धावणे आणि इन्फ्रारेड (IR) तंत्रज्ञानाचा वापर करून गोळा फेकीच्या लांबीचे मोजमाप केले जाणार आहे.

# भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाचे भव्य स्मारक उभारण्यासाठी 100 एकर जमीन संपादित करावी : केंद्रीय राज्यमंत्री आठवले



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन करण्यास दरवर्षी 1 जानेवारीला शौर्यदिनी देशभरातून लाखो आंबेडकरी अनुयायी भेट देत असतात. त्यामुळे या विजयस्तंभाचे भव्य स्मारक उभारले पाहिजे. त्यासाठी विजयस्तंभ परिसराची 100 एकर जमीन शासनाने संपादित करावी अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. आज दुपारी 12 वाजता ना.रामदास आठवले यांनी भीमा कोरेगाव येथे ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन केले. आपण राज्य आणि केंद्र सरकार तसेच समाजाच्या वतीने येथे अभिवादनास उपस्थित राहिलो असल्याचे रामदास आठवले म्हणाले.

ऐतिहासिक विजय स्तंभ स्मारकासाठी समाज कल्याण विभाग आणि प्रशासनाने आराखडा तयार केला असून त्यासाठी आवश्यक शंभर एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय राज्य सरकार ने त्वरित घ्यावा. एकदा भूसंपादन निर्णय राज्य सरकार ने घेतला की लगेच विजयस्तंभपरिसरातील अतिक्रमण निर्मूलन करता येईल.स्मारकासाठी ज्यांच्या जमिनी संपादित होतील त्यांना योग्य मोबदला देऊन योग्य पुनर्वसन करावे या मागणीसाठी आपण लवकर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचे रामदास आठवले म्हणाले.

भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकासाठी अधिकाधिक निधी मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील राहील तसेच संरक्षण मंत्र्यांची भेट घेऊन संरक्षण मंत्रालयातर्फे काही निधी मिळेल का याबद्दल प्रयत्न करणार असल्याचे ना.रामदास आठवले म्हणाले. यावेळी पूज्य भदंत राहुल बोधी महाथेरो; रिपाइं चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे;परशुराम वाडेकर; पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे;माजी उपमहापौर डॉ सिद्धार्थ धेंडे, पुणे शहर अध्यक्ष शैलेश चव्हाण, बाळासाहेब जानराव; संजय सोनवने, नगरसेविका हिमालीताई कांबळे, शशिकलाताई वाघमारे, डॉ विजय मोरे, सुमित वजाळे आदी मान्यवर तसेच समाज कल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# कंधार ग्रामीण रुग्णालयास सलग दुसऱ्यांदा'कायकल्प' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** कायाकल्प कार्यक्रम अंतर्गत कंधार ग्रामीण रुग्णालयास 2021-22 चा राज्यस्तरीय कायकल्प पुरस्कार जाहीर झाला आहे.आदरणीय जिल्हा शल्य चिकित्सक डॉ निळकंठ भोसीकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ सूर्यकांत लोणीकर यांच्या प्रभावी प्रशासनामुळे रोख एक लाख रुपयाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे कंधारच्या ग्रामीण रुग्णालयात मानाचा तुरा रोवला गेला आहे व कर्मचारी वर्गाचे मनोबल उंचावले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत 'गुणवत्ता आश्वासन' कायाकल्प कार्यक्रम राबविला जातो. या उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय आरोग्य अधिकाऱ्यांच्या एका पथकाकडून कंधार ग्रामीण रुग्णालयाची पाहणी करून परिसर स्वच्छता, संसर्ग नियंत्रण कचरा व्यवस्थापन ,आंतरुगण व बाह्यरुग्णांची काळजी, प्रसूतीगृह विभाग, शस्त्रक्रियागृह ,अपघात विभाग, माता व बाल संगोपनगृह, लसीकरण जनजागृती, औषधे, सर्व रेकोर्ड, कागदपत्रे व साहित्य आदी निकषांचे परीक्षण करण्यात आले होते. कंधार ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सूर्यकांत लोणीकर यांच्या वेळोवेळीच्या मार्गदर्शनामुळे वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश पोकले डॉ.राजू टोपे,डॉ पोरे, आधी परिचारिका शितल कदम , व कार्यक्रम प्रमुख राजश्री इनामदार, शिल्पा केळकर, अश्विनी जाभाडे, पल्लवी सोनकांबळे ,मयुरी रासवते, योगेश्वरी कबीर ,प्रशांत कुमठेकर, विष्णूकुमार केंद्रे, आदिसह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बजावलेल्या उल्लेखनीय कामगिरीची राज्य शासनाने दखल घेऊन कंधार ग्रामीण रुग्णालयास दुसऱ्यांदा 'कायाकल्प' पुरस्कार



जाहीर केला आहे. ग्रामीण रुग्णालयात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले, व रुग्णालय परिसरात झाडे वाचविण्यासाठी उद्यानाची निर्मिती केली, व उद्यानाला गेट बसविण्यात आले रुग्णांलयात जनरेटरची व्यवस्था केली तसेच पाणी शुद्धीकरण आरो बसविण्यात आले.

# रक्ताचे नाते नसतांनाही बेघरांना मदत करणाऱ्या जिव्हाळा केंद्राच्या मदतीसाठी पुढे या : वसंत मुंडे

## एकही बेघर उपाशी झोपू नये याची जबाबदारी पत्रकार संघाने वसंत मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त स्वीकारली





आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** कसलेही रक्ताचे नाते नसतांना रस्त्यावर फिरणाऱ्या बेघरांना, मनोरुग्णांना ज्यांच्या जवळून जाताना आपण नाक दाबतो अशा व्यक्तींची सेवा आनंदाने करणाऱ्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या व्यवस्थापनाचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. आज सरकारने बेघरांना देण्यात येणारे जेवण बंद केले आहे. त्यामुळे येथील लाभार्थ्यांना उपाशी झोपण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. एकही व्यक्ती उपाशी झोपू नये याची जबाबदारी पोट भरलेल्या प्रत्येक व्यक्तीने स्वीकारली पाहिजे. यासाठी पत्रकार संघ जबाबदारी स्वीकारत असल्याचे पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी जाहीर केले. बीड शहरातील भाजी मंडई येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील लाभार्थ्यांसमवेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा वाढदिवस रविवार दि. 1 जानेवारी रोजी दुपारी 1 वाजता साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानूरकर, अॅड.चंद्रकांत नवले, कलंदर पठाण, संपादक बाबा देशमाने, संपादक गंगाधर काळकुटे, शेखर कुमार, पसायदानचे गोवर्धन दराडे, पत्रकार बालाजी तोंडे, गुलदाद पठाण, पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, पत्रकार संघाचे शेख वसीम, अमजद पठाण, रईस खान, शेख आय्युब, शेख ताहेर, प्रतिभाताई गणोरकर, आत्माराम वाव्हळ, नामदेव वाघ, नवनाथ माने, भास्कर इप्पर, शेख इरफान, शैलेश गोलांडे, शिवप्रसाद सिरसाट, सामाजिक कार्यकर्त्या शेख शाकेरा मॅडम, जिव्हाळा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, संस्थेचे सचिव अभिजीत वैद्य, काळजीवाहक शालीनी परदेशी, कल्याण गोरे, यश वंजारे, सुजाता कांबळे, योजना स्वामी, कोमल राजपूत, ज्योती शिंदे, संगीता गायसमुद्रे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना वसंत मुंडे म्हणाले, जीवनाचा शेवट हा मृत्यु आहे. जाताना सर्व येथेच सोडून जायचे आहे. याचे वास्तव प्रत्येकाने स्वीकारणे गरजेचे आहे. जीवन जगतांना इतरांनाही काही देता आले पाहिजे. ही मानसिकता प्रत्येकाने जोपासणे गरजेचे आहे. गरजवंतांच्या सेवेतून परमार्थ ज्याला साधता आला त्याचे जीवन सफल झाले. जर आयुष्य यशस्वी करायचे असेल तर आपल्या शेजारचा उपाशी झोपू नये याची काळजी घेतली पाहिजे. त्यामुळेच आम्ही जिव्हाळा बेघर निवारा केंद्राला परिपूर्ण मदत करण्याचा निर्णय घेत आहोत असे जाहीर केले. याप्रसंगी पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानूरकर यांनी केवळ घोषणा नको, प्रत्यक्ष मदतीचा हात जिव्हाळा बेघर केंद्राला देणे गरजेचे आहे. याची सुरुवात मी माझ्या स्वतःपासून करतो. जिव्हाळा केंद्राला मी व माझ्या पत्नीच्या नावे दरमहा प्रत्येकी दोनशे रुपये मदत आजपासून देत आहे. इतरांनी देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. या प्रसंगी अॅड.चंद्रकांत नवले, संपादक गंगाधर काळकुटे, वैभव स्वामी आदिंनी मनोगत व्यक्त केले. अभिष्टचिंतन सोहळ्यानंतर मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या सर्व लाभार्थ्यांना जेवण देऊन वाढदिवस सोहळ्याची सांगता एका सामाजिक उपक्रमाने झाली.




**नेत्र तपासणी शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद :** पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ.राधेश्याम जाजू यांच्या डोळ्यांच्या दवाखान्यात मोफत नेत्रतपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीराला पत्रकार त्यांचे कुटुंबिय आणि जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबीरामध्ये पाच जणांना डोळ्याची गंभीर समस्या असल्याने शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्या डोळ्यावर महागडी शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याने पत्रकार संघ पुढाकार घेऊन त्यांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया दानशुरांच्या मदतीने लवकरच करणार आहे.

**मदतीसाठी हात सरसावले :** जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे यांनी केंद्रात साठ पेक्षा जास्त लाभार्थी असुन ते कष्ट करुन पोट भरू शकत नाहीत. या सर्वांना उपाशी झोपताना पाहवत नाही म्हणून आम्ही तीनशे दाते निवडणार आहोत. या दात्यांनी दरमहा किमान दोनशे रुपये प्रत्येकी द्यावेत अशी अपेक्षा आहे. या आवाहनाला पत्रकार संतोष मानूरकर यांनी तात्काळ प्रतिसाद देऊन स्वत:सह आपल्या धर्मपत्नीच्या नावे सभासदत्व स्वीकारले. तसेच यावेळी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, अॅड.चंद्रकांत नवले, कलंदर पठाण, गंगाधर काळकुटे, बाबा देशमाने, वैभव स्वामी, प्रतिभा गणोरकर यांनी दोनशे रुपये प्रत्येकी या प्रमाणे सभासदत्व स्वीकारले असुन वसंत मुंडे यांनी जेवढे सभासद कमी पडतील ती संख्या पूर्ण करण्याची जबाबदारी पत्रकार संघ घेईल असे जाहीर करुन जिव्हाळा केंद्राला आत्मविश्वास दिला.

# कोरेगाव-भीमा परिसरात कडेकोट बंदोबस्त

## ७० जणांना उपस्थित राहण्यास मनाई

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कोरेगाव-भीमा ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळयासाठी रविवारी (१ जानेवारी) होणारी गर्दी विचारात घेऊन पुणे पोलीस तसेच ग्रामीण पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. अभिवादनासाठी येणाऱ्या राज्यभरातील ७० कार्यकर्त्यांना कोरेगाव भीमा परिसरात येण्यास मनाई करण्यात आली आहे. समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या चौघांना नोटीसही बजावण्यात आली आहे. अभिवादन सोहळयासाठी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित राहतात. गर्दीमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पुणे ग्रामीण, पुणे शहर तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे. ग्रामीण पोलिसांनी ठेवलेल्या बंदोबस्ताचा आढावा कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी शनिवारी (३१ डिसेंबर) यांनी घेतला. यावेळी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अंकित गोयल उपस्थित होते. गर्दीच्या व्यवस्थापनाची तसेच तपासणीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. गैरप्रकार रोखण्यासाठी पुणे तसेच राज्यातील ७० जणांना कलम १४४ अनुसार कोरेगाव-भीमा परिसरात येण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. आदेशाचा भंग केल्यास त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी सांगितले. अभिवादन सोहळयाच्या अनुषंगाने पोलिसांनी समाजमाध्यमांवरील मजकुरावर बारकाईने लक्ष ठेवले आहे. पुणे पोलीस, ग्रामीण पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेकडून समाजमाध्यमांवर प्रसारित केल्या जाणाऱ्या मजकुरांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या चौघांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. या सोहळयासाठी येणाऱ्या अनुयानांनी पोलिसांना सहकार्य करून कार्यक्रम शांततेत पार पाडावा, असे आवाहन विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी केले आहे. कोरेगाव-भीमा ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळयासाठी होणारी गर्दी विचारात घेऊन रविवारी पेरणे फाटा परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे एक हजार जवान, शीघ्र कृती दल, राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकडया बंदोबस्तात राहणार आहेत. अभिवादन सोहळयात होणारी गर्दी विचारात घेऊन पेरणे फाटा परिसरात २४० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून या सोहळयावर ड्रोन कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे.



